आंदोलन

वर्ष 16 | अंक 07 | मूल्य 25/-

शाश्वत विकासासाठी

फेब्रुवारी 2025 | पृष्ठे 36

आम्ही भारताचे लोक...!

शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक सातवा

फेब्रुवारी २०२५ ॐ मूल्य रु. २०/-

- **संपादक**
  मेधा पाटकर

  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर, अमेय तिरोडकर, सुनीती सु. र., सुरेश सावंत, साधना दधीच, मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
  ‘आंदोलन’च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.
- अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय/ ‘प्रजासत्ताका’चा खरा आशय: सत्ताधाऱ्यांवर जनतेचा लगाम हवा!/ **संजय मं. गो.**/ ३

विशेष/पाण्याच्या थेंबाशी इमान असणारे विलासराव साळुंखे/ **वीणा गव्हाणकर**/ ५

विशेष/संविधान सभेतल्या शलाका/ **सुरेश सावंत**/ ८

आदरांजली/मोहन हिराबाई हिरालाल: स्वयंशासनाचे प्रणेते/ **ए के शिबुराज**/ १०

आदरांजली/संत गाडगेबाबा: शेवटचे विद्रोही कीर्तनकार/ **श्रीकांत ढेरंगे**/ १२

टिप्पणी/ ‘आम्ही अतिरेकी आहोत ?’ अरुणाचल प्रदेशात स्थानिकांचा संताप/ **रोकिबुझ जमान**/ १४

टिप्पणी/बुलडोझर राज: पत्रकाराचे घर बेकायदेशीररित्या पाडले/ **स्क्रोल प्रतिनिधी**/ १८

टिप्पणी/ २०१९ नंतर जम्मू-काश्मीरची भरभराट झाली ?/ **सफवत झारगर**/ १९

टिप्पणी/मि. प्रेसिडेंटपेक्षा मरियन बडी/ **प्रदीप आवटे**/ २०

टिप्पणी/जपानच्या अणू बॉम्ब स्फोटातून वाचलेल्यांच्या संघटनेला नोबेल पुरस्कार/ **डॉ. सुहास कोल्हेकर**/ २२

टिप्पणी/शिक्षण संस्थातील जातिभेदात रुजत आहेत विद्वेषाची मुळे/ **मीनल उत्तुरकर**/ २३

टिप्पणी/राज्यातील महायुतीचे ६२ टक्के मंत्री गुन्हेगारी पार्श्वभूमीचे/ २५

चर्चा/शेतकऱ्यांचा जीव महत्वाचा की हिंस्त्र प्राण्यांचा?/ **सतीश देशमुख**/ २६

वृत्तांत/प्रेमाची पखरण करणारा साहित्य कला संवाद/ **सिरत सातपुते**/ २९

श्रमिक जगत/रेल्वेतील कंत्राटी कामगारांच्या लढ्याला यश!/ **जगदीश खैरालिया**/ ३२

आघाडीवर/राज्यभर पुरेशी सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करा/ **किसान सभा**/ ३३

आघाडीवर/आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहित जोडप्यांसाठी ‘सेफ हाऊस’ निर्णयाचे स्वागत / **राईट टू लव्ह**/ ३३

प्रतिसाद/अतिशय उत्तम आणि संग्राह्य अंक/ **सुनील तांबे**/ ३६

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi

Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com

मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक २

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-

१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट ‘आंदोलन शाश्वत विकासासाठी’ ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

‘प्रजासत्ताका’चा खरा आशय: सत्ताधाऱ्यांवर जनतेचा लगाम हवा!

भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्य मिळण्याच्या टप्प्यावर, संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. संविधान सभेत भारतातील सर्व जाती, धर्म, प्रांत आणि राजकीय विचार यांना प्रतिनिधित्व होते. संविधान सभेने सर्वानुमते निर्णय घेत संविधान तयार केलेले असल्यामुळे, संविधानाचे सार सांगणाऱ्या प्रास्ताविकेची सुरुवातच ‘आम्ही भारताचे लोक‘ या भूमिकेने झाली तर शेवट ‘आम्ही हे संविधान आमच्याप्रत अर्पण करत आहोत‘, असा स्वावलंबी हुंकारही व्यक्त झाला. खऱ्या अर्थाने लोकांनी, लोकांसाठी बनवलेले संविधान असे त्याचे स्वरूप असल्याचे प्रास्ताविकेतच अधोरेखित झाले.

मुहमें संविधान गौरव,
बगलमें संविधान तोडण्याची छुरी

अर्थात हे सगळे असले तरी, संविधान निर्मितीबाबत सुरुवातीपासूनच असहमती व्यक्त करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या स्वातंत्र्य आंदोलना पासूनच दूर राहिलेल्या संघटना होत्याच. स्वातंत्र्य आंदोलनातून विकसित झालेली सर्वसमावेशकता, आणि सर्व धर्मांना जोडणारे composite culture ज्या धर्मवेड्यांना मान्य नव्हते, त्यांचा विरोध स्वाभाविक असला तरी त्यांच्या पाठी जराही जनमत नव्हते. एका परीने स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात विकसित झालेले धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी आणि समाजवादी समाजरचनेचे स्वप्न, संविधानाने पुढे नेण्याचे काम करून ठेवलेले आहे. त्यामुळेच आज संविधान लागू होवून ७५ वर्षांनंतरही व या दरम्यान अनेकवार संविधानातील काही कलमात कालानुरूप बदल होत गेले असले तरी, संविधानाचा समतेचा जो मूळ आत्मा आहे, त्याला धक्का लागलेला नाही. अर्थात आता मिळालेल्या सत्तेच्या आधारे संविधानविरोधी जे जे शक्य आहे ते करत राहायचे आणि लोकांसमोर मात्र संविधानाचे गोडवे गाण्याचे नाटक करायचे, अशी दुहेरी कुनीती भाजप – संघाने अवलंबली आहे. त्याकडे बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. गेल्या दहा वर्षात विशेषत: मोदी – शहांच्या कारकिर्दीत ज्या प्रच्छन्न रीतीने संविधानातील एकेक तरतूद बिनदिक्कतपणे कोलमडवून टाकण्यात आली आहे की आगामी ५ वर्षाच्या सत्ताकाळात व संघाच्या शताब्दी वर्षात हे मोडतोडीचे कुटील कारस्थान अधिक वेग घेणार, यात शंका नाही. संविधानातील शिक्षणाचा, रोजगाराचा, जगण्याचा, पर्यावरण रक्षणाचा असे एकेक हक्क मोदी सरकारने एकामागोमाग एक करत ध्वस्त करून टाकलेत. योगेंद्र यादव म्हणतात, ”आपल्या संस्था संपुष्टात येवू लागल्या, आपण स्वातंत्र्य गमावू लागलो, आपले आवाज क्षीण झाले, आपलं शहाणपण हरवलं! ... आपण आपलं संविधान, आपली लोकशाही हरवत चाललो आहोत, .. आणीबाणीच्या काळात हरवलेल्या सांविधानिक लोकशाहीहून खूप काही मौल्यवान आपण गमावतो आहोत”. मागच्या लोकसभा निवडणुकीत चारसो पार जागा मिळवून, संविधान बदलून टाकण्याची संघ – भाजपाची घोषणा त्यांच्या अंगलट आल्याने; आता ‘मुहमे संविधान गौरव आणि बगलमे संविधान कुचकामी करण्याची छुरी’, अशी कुटील नीती त्यांनी अवलंबली आहे. ‘प्रथम संविधान – मनुस्मृती’ असे म्हणत त्याबाबतच्या प्रशिक्षण वर्गांची राजरोस सुरुवातही त्यांनी केली आहे. धर्मविद्या, कर्मकांड, छद्मविज्ञान यांना प्राधान्य आणि शास्त्र, विज्ञान, आधुनिक संशोधन यांच्यावर संक्रांत, अशी धोरणे आखली जात आहेत.

समता, लोकशाही, बंधुता आणि स्वातंत्र्य
या मूल्यांना पर्याय नाही

माणूस समाजा सोबतच विकसित होत असतो. समाजातील एखादी कडी थोडी विस्कळीत झाली तरी सर्व व्यवस्था गडबडते. माणसाला समाधानकारक आणि निर्विघ्न जगण्यासाठी, आपसात स्पर्धेपेक्षा परस्पर सहकार्य अनिवार्य असते. परस्पर सहकार्यात आपसात प्रेम, आदर, आपुलकी आणि योग्य व्यवहार नसले तर ते सहकार्य झाकोळते. विस्कळीत होते. सहकार्याऐवजी दमदाटी, अरेरावी, बळजबरी आणि विषम वागणूक बळावते. अशा रीतीने आपसातील सामंजस्य कमी झाले की जीवन तणावग्रस्त बनते. आपसात आकस, असूया, तिरस्कार या भावना बळावतात आणि माणसा – माणसातील दुरावा वाढीस लागतो. हे टाळायचे असेल तर माणसाने निसर्गाकडून शिकायला हवे, सर्वांशी समतेने वागणे.

सर्वांप्रती समभाव बाळगणे. कवीने आपल्या गाण्यात म्हटलंय ना, 'सूर्याचा प्रकाश सर्वा समान, धरणीच्या पोटातलं पाणी समान, फिरणारा वारा सर्वा समान हाय रं, मग जमीन का सर्वांना समान नाय रं'! माणसातील स्वार्थ, ईर्षा, आपमतलबी वृत्ती यामुळे निसर्गातले हे समतेचे तत्व, माणूस गुंडाळून ठेवतो आणि मग सुरू होतो कलह, बळावते विषमता आणि जीवन खुशहाल बनण्याऐवजी बनते संघर्षग्रस्त! हे टाळायचे असेल तर समता, लोकशाही, बंधुता आणि स्वातंत्र्य या मूल्यांना पर्याय नाही. 'कुणी कुणाहून मोठा नाही, कुणी कुणाहून छोटा नाही, आपण सारे बहीण-भाऊ हाच मनात विचार', अशी वृत्ती आवश्यक आहे. आपल्याकडे शिक्षणाने, सांपत्तिक स्थितीने, वयाने, पुरुषत्वाने, जातीने मोठेपण ठरवले जाते. माणसा माणसात सबल – दुर्बल अशी वर्गवारी निर्माण केली जाते. दुर्बलांप्रती हीनतेची, तिरस्काराची भावना निर्माण केली जाते. 'जिसकी लाठी ऊसकी भैस', या भूमिकेतून दुर्बलांचे न्याय्य हक्क डावलले जातात. आपल्या अनैतिक आणि अमानवी वागण्याचे समर्थन करण्यासाठी पूर्वजन्माची फळे, पाप – पुण्य या संकल्पना प्रचलित होतात. यातून विषमता, शोषण व अन्याय वाढीस लागतात. विकासाची समान संधी नाकारली जाते.

समता आणि लोकशाही यांचाही खूप घनिष्ठ संबंध. जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू! लोकशाही याचा अर्थ सर्व समान. सर्वांना समान संधी, अर्थात समता. लोकशाही म्हणजे सर्वांना व्यक्त होण्याचा अधिकार. सर्वांना सर्व जाणून घेण्याचा अधिकार. शिकण्याचा अधिकार. मनासारखा व्यवसाय निवडण्याचा अधिकार. आपल्या क्षमतेनुसार आपले क्षेत्र निवडण्याचा अधिकार. यात जसा प्रत्येक मानवाप्रती आदरभाव, समभाव आहे तसाच समूह म्हणून अशी व्यवस्था राबविणाऱ्यांचाही अधिक विकास आहे. एखाद्या चांगली क्षमता असणाऱ्या व्यक्तीस केवळ तो गरीब वा तथाकथित खालच्या जातीतला आहे म्हणून त्याच्या आवडीचे व चांगली क्षमता असणारे क्षेत्र नाकारले तर त्या व्यक्तीवर अन्याय होतोच. पण त्या क्षेत्रात ती व्यक्ती आल्याने, तिच्या क्षमतेमुळे तिचा आणि सोबतच जो समूहाचा .. समाजाचा फायदा संभव होता तो आपण गमावतो. हुशारी, विद्वत्ता, समज, आकलन, प्रकांड पांडित्य ही कुणा एका जातीची, वंशाची मिरासदारी नसते याची असंख्य उदाहरणे आसपास आहेत.

समता आणि लोकशाहीतच पुढचे एक तत्व अनुस्यूत आहे ते म्हणजे बंधुतेचे. भगिनी – बंधु भावाचे. समाजात लोकशाही, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य जेंव्हा नांदत असते तेंव्हा आपसूक पाचवे मूल्य स्थिरावते. ते म्हणजे न्यायाचे. विषमतेमध्ये विषम वागणुकीचा सामना कराव्या लागणाऱ्या व्यक्ती वा समूहाला अन्यायाचा मुकाबला करावा लागत असतो. आपली आवड आणि क्षमता यांना मुरड घालून निमूट वरिष्ठ समाजाचे वा त्यांच्या धुरिणांचे ऐकावे लागते. अशा ठिकाणी ना स्वातंत्र्य, ना समता, ना बंधुभाव, ना लोकशाही. निव्वळ अन्यायाचा भडिमार!

जनतेची भूमिका न्यायसंगत असणे आवश्यक

देशाच्या संविधानाला ७५ आणि स्वातंत्र्याला ७७ वर्षे पूर्ण होत असताना, आपल्या देशातील सद्यस्थिती कशी आहे? घरात स्त्रीला स्वातंत्र्य आहे का? लहान वा किशोरवयीन बालकाला समतेची वागणूक मिळते का? सर्व मुलांना शिक्षणाचा समान हक्क मिळतो का? युवा वर्गाला आपल्या क्षमतेनुसार योग्य नोकरी किंवा व्यवसायाची संधी मिळते का? रोजगार असणाऱ्या सर्वांच्या हाती योग्य पगार पडतो का? शेतकऱ्याला आपल्या शेतमालाला रास्त हमी भाव मिळतो का? दलित आदिवासींना विकासाच्या समान संधी प्राप्त होतात का? एक ना दोन. ज्या ज्या न्याय्य बाबींबाबत नकारार्थी उत्तरांची हमखास हमी आहे, अशा या असंख्य प्रश्नांची यादी आपल्यापाशी आहे. याबाबत जनतेची भूमिका न्यायसंगत असेल तरच आपण याबाबत अन्याय्य सत्तेशी समर्थपणे दोन हात करू शकतो.

घरादारातील कौटुंबिक वर्तन व्यवहारांपासून, नोकरीच्या ठिकाणी, शिक्षणाच्या जागी, समाजातील अनेक व्यवहारात आणि अखेरीस राजकीय सत्ता व्यवहारात लोकशाही, समता, बंधुता, सर्वधर्मसमभाव, स्वातंत्र्य आणि न्याय ही मूल्ये संविधानानुसार अभिप्रेत आहेत. कमी अधिक प्रमाणात ती सर्वत्र अस्तित्वात असली तरी खूप पल्ला गाठायचाय, हे विसरून चालणार नाही. या साठी जशी 'वर' तयारी हवी, तशी त्याची आस 'खाली' ही जाणवायला हवी. सारे काही सत्ताधाऱ्यांवर अवलंबून, असे चालणार नाही. समाजाच्या, व्यक्ति – व्यक्तीच्या पातळीवर, व्यवहारातही

(पान १७ वर)

विशेष

पाण्याच्या थेंबाशी इमान असणारे विलासराव साळुंखे

(भागीरथाचे वारस या पुस्तकाची प्रस्तावना)

वीणा गव्हाणकर

२ ० ० ३ च्या २ ३ एप्रिल रोजी विलासराव साळुंखे यांचा प्रथम स्मृतिदिन होता. मी पुण्यातच होते. म्हणून त्या कार्यक्रमाला गेले. नंतर उत्सुकतेनं पुरंदर तालुक्यात दुष्काळी पूर्व भागातल्या काही उपसासिंचन योजना पाहून आले आणि मग त्यात गुंततच गेले...

भारत हा कृषिप्रधान देश. भारताची शेती मोसमी पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. त्याला तोंड देण्यासाठी, शेतीला पाणीपुरवठा करण्याची सोय करणाऱ्या विविध योजना प्राचीन काळापासून राबवल्या गेल्या. सिंधू संस्कृतीत, यजुर्वेदात, निघंटू कोशात त्यांचे पुरावे मिळतात. स्मृतिकारांनीही विहिरी खोदणं, सरोवर निर्माण करणं, कालवे काढणं अशा लोकोपयुक्त कार्यासाठी आवाहन केलेलं आहे.

'नवीन वसाहती निर्माण करताना जलसेतू सामूहिकपणे बांधावेत, त्यात सर्वांचा सहभाग असावा, असहकार वा जलापव्यय करणाऱ्यास किंवा कालव्याच्या बांधकामाचं नुकसान करणाऱ्यास दंड करावा,' अशा सूचना कौटिल्यानं 'अर्थशास्त्रा'त केल्यात. तसंच त्यानं अन्नधान्यांचं पीक उत्तम, भाजीपाला मध्यम आणि ऊस कनिष्ठ अशी पिकांची प्रतवारीही सांगितली आहे. उसाच्या पिकाला पाणी फार लागतं, याची चर्चाही तो करतो. सुराज्याविषयी कौटिल्य म्हणतो, 'जे राज्य आपल्या कृषि उत्पादनासाठी पावसावर अवलंबून न राहता, अधिकाधिक सिंचनावर अवलंबून असतं, ते अधिक समृद्ध असतं.'

पराशर ऋषींनी आपल्या 'कृषि पाराशर' ग्रंथात सिंचनावर अवलंबून असणाऱ्या जमिनीची विशेष देखभाल करण्यावर भर दिला आहे. धरणासाठी 'पालीबंधन' हा शब्दप्रयोग त्यांनीच रूढ केला. रहाटगाड्याची कल्पनाही त्यांनी मांडलीय. प्राचीन काळातही भारतीय समाजमनात सिंचन आणि सिंचनविषयक कल्पना स्पष्ट होत्या. लहरी पावसापेक्षा खात्रीच्या सिंचनव्यवस्थेनं राज्य समृद्ध होतं, हे अनुभवानं पटलेलं होतं.इ. स. पू. चौथ्या शतकापासून इ. स. सतराव्या शतकापर्यंत भारतीय वाङ्मयातून आणि शिलालेखांतून सिंचनपद्धतीचा उल्लेख वेळोवेळी झालेला आढळतो. खानदेशातील फड पद्धती, विदर्भातील मालगुजारी तलाव, मराठवाड्यातील खजाना विहिरी, बारव विहिरी ही लोकांनी, लोकांसाठी चालवलेल्या सिंचन व्यवस्थेची उदाहरणं. दक्षिण कोकणातील झऱ्यावरील सिंचन हेही अशापैकी. या व्यवस्था पाहता, महाराष्ट्राच्या विविध भागांत वेगवेगळ्या प्रकारे सिंचनाची आणि त्यातील लोकसहभागाची प्रदीर्घ परंपरा होती, असं आढळतं. ही परंपरा ब्रिटिश काळातील शासन–नियंत्रित कार्यपद्धतीपेक्षा वेगळी, विकेंद्रित अशी होती.

निसर्गाच्या – विशेषत: मोसमी पावसाच्या लहरीपणावर मात करण्यासाठी तलाव बांधून पाण्याची साठवणूक करणं आणि त्या साठ्याचा उपयोग उर्वरित काळात सिंचनासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी करणं हेही महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्राचीन काळापासून आढळतं. महाराष्ट्रातल्या विविध भागांत पिकांमध्ये व सिंचनाच्या पाणी पुरवठ्याच्या रचनांमध्ये निसर्गानुकूल विविधता होती आणि ती स्थानीय भौगोलिक व हवामानाच्या परिस्थितीनुरूप होती. पाणी वितरणाच्या पद्धतीही त्यानुरूप होत्या. स्थानिक राजांकडून सिंचनाच्या विकासाला प्रोत्साहन आणि साहाय्य दिलं जात होतं. सिंचन-व्यवस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनात मात्र त्यांची मुळीच ढवळाढवळ नसे. सिंचन- व्यवस्थेची देखभाल आणि व्यवस्थापनपद्धती पूर्णत: लाभार्थीच्या हाती होती. लोकांनी चालवलेल्या या सिंचनयोजना लहान क्षेत्रांवरील होत्या.

स्पेनमध्ये व्हॅलेन्शिया गावातील तुरिया या नदीच्या कालव्यावर भिजणाऱ्या १ ८ ० ० हेक्टर जमिनीच्या सिंचनाबाबत निर्माण होणाऱ्या तंट्याचा निवाडा तिथलं जलन्यायालय करतं. हे व्हॅलेन्शिया जलप्राधिकरण एक हजार वर्षांचं जुनं आहे. आजही ते कार्यरत आहे. या जलप्राधिकरणाच्या यशामुळं एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश सरकारनं भारतीय उपखंडात अशा प्रकारची सिंचन व्यवस्था राबवण्याच्या हेतूनं या व्यवस्थेचा मागोवा घेतला

होता. सध्या बोस्टन विद्यापीठातील इतिहासाचे अभ्यासक थॉमस ग्लीक हे या व्यवस्थेचा अभ्यास करीत आहेत. ते या अभ्यासात नमूद करतात, 'समन्यायी आणि परिणामकारक वापरासाठी व्हॅलेन्शिया येथील जलप्राधिकरणाची व्यवस्था सक्षम आहे, असे ब्रिटिश सरकारला आढळून आले; पण या व्यवस्थेमुळे लोक स्वावलंबी झाले असते, आणि पाण्यावर सरकारचं नियंत्रण व मालकी शाबीत करण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतू निष्फळ ठरला असता. म्हणून ही पद्धत लागू करण्यात आली नाही.

गावच्या प्रतिनिधी सभेचा, स्थानिक स्वराज्य संस्थाचं स्वातंत्र्य आणि अधिकार यांचा या जलप्राधिकरणात मोलाचा वाटा आहे. नेमकं हेच ब्रिटिशांच्या पचनी पडणं कठीण होतं. सर्व काही आपल्याच मुठीत असावं, अशा मनोवृत्तीतून नैसर्गिक साधन-संपत्तीवरही त्यांनी आपला अधिकार कायम ठेवला. यातूनच पुढं त्यांनी मोठी धरणं बांधून दुष्काळी भागाला पाणी द्यायचं धोरण स्वीकारलं आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपणही तेच चालू ठेवलं. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सिंचन प्रकल्पांचे आकार वाढले आणि त्याचबरोबर त्यात शासनावलंबित्वही आलं. प्रकल्प सरकारनं बांधायचा. त्याची देखभाल व दुरुस्ती आणि पाण्याचं वाटप सरकारनंच करायचं, अशी प्रथा सुरू झाली. लोकांना त्याचीच सवय लागली आणि लोकसहभाग कमी कमी होत गेला.

स्वातंत्र्य मिळाल्यावर भारत औद्योगिक क्रांतीच्या दिशेनं निघाला. पाणी वापराबाबत सरकारनं अग्रक्रम ठरवले - प्रथम पिण्यासाठी, द्वितीय स्थान उद्योगांना आणि शेवटी शेतीसाठी. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचं उत्पन्न १९४७ साली ५०% होतं, ते आता २५% झालंय. कृषिप्रधान भारताचं रूपांतर औद्योगिक भारतात व्हावं, म्हणून नियोजनबद्ध पंचवार्षिक योजना आखल्या - राबवल्या जात आहेत. त्यामुळे लोकसंख्येचं विभाजन ग्रामीण आणि शहरी विभागांत सुरू झालंय. वाढत्या शहरीकरणामुळे गेल्या पन्नास वर्षांत ग्रामीण भागातील लोकसंख्येची टक्केवारी ७० टक्क्यांवरून ४० ते ५० टक्क्यां एवढी कमी झालेली आहे; आणि तरीही एकूण ग्रामीण लोकसंख्या या काळात दुप्पटीनं वाढलेली आहे. याचा अर्थ घटत चाललेल्या शेती–उत्पादनाला वाढत चाललेल्या ग्रामीण लोकसंख्येला तोंड द्यायचं आहे.

वाढती लोकसंख्या आणि वाढतं औद्योगिकीकरण आणि सर्वच क्षेत्रांतील पाण्याच्या अविवेकी वापरामुळे शेतीसाठी पाणी कमी पडतंय आणि ते आणखी कमी होत जाणार आहे. पाणी अडवण्याच्या आणि साठवण्याच्या दृष्टीनं गेलं अर्धं शतक शासकीय आणि स्वयंसेवी संघटनांच्या पातळीवर अनेक प्रयोग चालू आहेत. आधुनिक तंत्रानं मोठमोठे जलसाठेही निर्माण झालेत. मात्र त्या प्रयत्नात पाण्याचं न्याय्य वाटप आणि त्यासाठीचा लोकसहभाग ही तत्त्वं दुर्लक्षिली गेलीत. त्यामुळं अनेक योजना अयशस्वी ठरल्यात. त्यातून मूठभर जलदांडगे मात्र निर्माण झालेत. 'पाणीदारी' पोसली गेलीय. त्या जलसत्तेनं श्रीमंत आणि गरीब यांच्यातली दरी रुंदावलीय.

तुकड्यातुकड्यांनी (Sectoral) पाहिलं, तर औद्योगिक क्षेत्रांत आणि कृषिउत्पादनात काही बाबतींत आपण प्रगती केली. हरित क्रांतीच्या रूपानं शेतीत सुधारणा आल्या. भारतातील ५०० जिल्ह्यांपैकी ७० जिल्ह्यांना त्यांचा लाभ घडला. त्या क्रांतीत संकरित बियाणं, भरपूर पीक देणारी, पण जास्त पाणी लागणारी वाणं, रासायनिक खतं, कीडनाशकं स्वीकारावी लागली आणि जमिनीचा कसही घालवून बसलो. कमी पाण्यावर येणाऱ्या ज्वारी–बाजरीसारख्या भुसार पिकांकडं, गळित धान्यांकडं, कडधान्यांकडं दुर्लक्ष झालं. बागायती करू शकणारे श्रीमंत झाले, पण भुसार पिकांवर जगणारे कोरडवाहू उपेक्षित, दुर्लक्षित राहिले. त्यांचा विचार झालाच नाही. जिरायत शेतीची उत्पादकता घटत चालल्यानं, जिरायत शेतकऱ्यांची गरिबी वाढतेय, बेरोजगारी वाढतेय. परिणामत: निरक्षरताही वाढतेय. हे चक्र अधिकाधिक गतिमान होतंय.

१९९१ पासून भारतानं उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या दिशेनं वाटचाल सुरू केलीय आणि तेव्हापासूनच कृषिक्षेत्राची पीछेहाट वेगानं सुरू झाली. कृषी मालाच्या किंमतीही घसरल्या. त्यामुळे कृषी हा आतबट्ट्याचा व्यवहार होऊन बसला. कृषिक्षेत्रातील गुंतवणूक कमी झाल्यानं आणि आर्थिक संस्थांकडून उपलब्ध होणार कर्जपुरवठा घटल्यानं कृषिक्षेत्र अधिकच अडचणीत आलंय. उदारीकरणाच्या काळात कृषी विकास दर ३.७ टक्क्यांवरून २.३ टक्क्यांवर घसरला. १९९७ मध्ये अन्नधान्य-उपलब्धता दरडोई १७४ किलो होती, ती आता १५० किलो

एवढी (म्हणजे १९५०–५१ मध्ये होती, तेवढीच) झाली आहे.

आता कृषिउत्पादनाची दिशाही बदलली आहे. अन्नधान्यापेक्षा निर्यातीसाठी योग्य पिकं घेतली जातात. अशानं भारतीय कृषिव्यवस्था मोडून पडेल आणि भारताची अन्नधान्यातील आत्मनिर्भरता धोक्यात येईल, अशी परिस्थिती संभवते. अन्नधान्य सुरक्षितता ही देशाचं स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या दृष्टीनं महत्त्वाची असते, हे नजरेआड करून चालणार नाही. राष्ट्रीय शेतकी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामिनाथन म्हणतात, "आपल्या देशातील सर्वात मोठं खाजगी क्षेत्र शेती हेच आहे. जवळपास साठ कोटी लोक या क्षेत्रात आहेत. लोकांना उत्पन्न, रोजगार शेतीतच आहे. जमीन व पाण्यावर आधारित जे जे उद्योगव्यवसाय आहेत, ते सर्व शेतीमध्ये येतात. (आपल्यासारख्या) कृषिप्रधान देशानं अन्नधान्याची आयात करणं, हे बेरोजगारी आयात करण्यासारखं आहे. फक्त उद्योग हेच क्षेत्र रोजगार देऊ शकतं, शेती नाही, हा समज आता मागं पडला. उद्योगधंद्यामधील रोजगार देण्याची क्षमता खुंटली आहे. ती क्षमता आता फक्त शेतीतच आहे."

आधुनिक आणि औद्योगिक शेतीसाठी आपल्याकडं इस्त्रायलच्या जलसिंचन तंत्रज्ञानाचे गोडवे गायले जातात. त्याचे दाखले दिले जातात. मात्र त्या राष्ट्रानं जलव्यवस्थापनाचे कठोर कायदे करून 'पाणीदारी' आणि पाणीप्रदूषण यांना अटकाव कसा घातलाय, यावर फारसं कोणी बोलत नाही. विलासराव साळुंखे यांनी भर दिला तो या जलव्यवस्थापनावर. देशाचं सरासरी उत्पन्न वाढलं म्हणजे देशातल्या प्रत्येकाचा विकास झाला नाही. वाढलेली सरासरी 'आहे रे' आणि 'नाही रे' यांची मिळून असते. 'नाही रे'-वाल्यांचा विकास होतो, तेव्हाच खऱ्या अर्थी राष्ट्राचा आर्थिक आणि सामाजिक विकास झालेला असतो. ग्रामीण भागातील बहुसंख्य 'नाही रे' वाल्यांचा विकास व्हायचा असेल, तर विकासाचं मुख्य साधन पाणी त्यांच्यापर्यंत पोहोचलं पाहिजे. मग प्रश्न उभा राहतो. हे शक्य आहे? प्रत्येकाला पाणी मिळायला हवं की नाही? ते कसं मिळावं? किती मिळावं ? १९७२ पासून २००२ पर्यंत सलग तीस वर्षं विलासराव तोच एक ध्यास घेऊन प्रयत्न करीत होते. त्या प्रयत्नांना आधार होता, त्यांनी स्वत: उभ्या केलेल्या प्रयोग–प्रकल्पांचा. ग्रामीण भागातील कुटुंबाला किमान पाण्याची सुरक्षितता असावी. जलसंपत्ती ही एकूण समाजाची सामूहिक संपत्ती आहे आणि पाण्याचं वाटप हे सर्वांना समन्यायानं व्हावं, यासाठी ते शेवटच्या श्वासापर्यंत झगडत होते. तन–मन–धन आणि बुद्धी वेचून 'उदक चालवावें युक्ती', ही संत तुकारामांची उक्ती आग्रहपूर्वक मांडत होते. समन्यायी पाणी वाटपाचा आणि पाणी व्यवस्थापनाचा नवा विचार मांडून, पाणी चळवळीला वेगळी दिशा देणारे विलासराव साळुंखे हे महाराष्ट्रातच नव्हे, भारतातही प्रथम. 'नाही रे' वाल्यांच्या उत्कर्षासाठी कृतिशील राहून त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या अंत्योदयाचा वारसा पुढं चालू ठेवला. कुठलीही तडजोड न करता आपल्या तत्त्वांशी, विचारांशी प्रामाणिक राहून त्यांनी तो जपला, हे विशेष.

विलासरावांचा समानतेचा आग्रह मानवी मूल्यं, समाजधारणा जपणारा आहे. म्हणून तो महत्त्वाचा आहे; पण तो स्वीकारणं, पचवणं कठीण. व्यवहारात उतरवताना त्याला विरोध होणं अटळच. आदर्श विचार व्यवहारात उतरवणं हीच खरी प्रगती. 'आहे' कडून 'असावं' कडं जाणं हाच विकास. 'आहे' आणि 'असावं यांत नेहमीच संघर्ष असतो. या संघर्षात विलासराव मोठ्या निर्धारानं, निधडेपणानं 'असावं' ची बाजू लढवत राहिले, हेच त्यांचं वेगळेपण. विलासरावांचे जलव्यवस्थापनाचे विचार आज किती लागू पडतात, याची झलक मला या पुस्तकाच्या निमित्तानं पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागात २००३ सालात फिरत असताना पाहायला मिळाली. नाझरे धरण बांधलं गेलं, ते त्याच्या लाभक्षेत्रातील शंभर टक्के लोकसंख्येला आठमाही पाणी सिंचनासाठी मिळावं, यासाठी. पण हे पाणी उपलब्ध होताच धरणावर विहिरी घेऊन बारमाही पाणी उपसून, लोक ऊसशेती करू लागले. धालेवाडीची सामुदायिक उपसा सिंचन योजना याच परिसरातील. १९९८ सालापर्यंत ती व्यवस्थित चालू होती, पण तिच्या लाभार्थींना इतरांप्रमाणे ऊसशेतीची हिरवी स्वप्नं पडू लागली. योजनेच्या बहुतेक सदस्यांनी स्वतंत्र योजना उभ्या केल्या, ऊस लावला. सामुदायिक सिंचन योजनेतल्या सदस्यांची संख्या रोडावली. उर्वरित सदस्यांना योजनेचा खर्च झेपेना, सामुदायिक योजना बंद पडली. बारमाही पाणी उपसून नाझरे धरण आज कोरडं पडलंय. नियोजित विकासाचं हे फलित.

ऑगस्ट २००४ मध्ये मी पोंढे इथं गेले असता, सद्य:स्थिती दिसली ती अशी, विधानसभेच्या निवडणुका जाहीर

(पान २१ वर)

विशेष

संविधान सभेतल्या शलाका

सुरेश सावंत

देशाचं स्वातंत्र्य असो अथवा देशाची राज्यघटना बनवणाऱ्या संविधानसभेचं कामकाज. यातल्या सहभागींप्रति कृतज्ञता व्यक्त करताना सर्रासपणे पुरुषांचाच उल्लेख केला जातो. इंग्रजीत 'फाऊंडिंग फादर्स' असेच बोलले जाते. – यात 'मदर्स' चा उल्लेख का होत नाही ? ...हा प्रश्न सहसा कोणाला पडत नाही. स्वातंत्र्याच्या संग्रामात लढणारे किंवा संविधान बनवणारे फक्त 'पिता' नव्हते. त्यात 'माता'ही होत्या. कमी होत्या. पण नगण्य नव्हत्या. त्यांची संख्या आणि कामगिरी ही दखल न घेण्याइतकी सामान्य नव्हती. खरं तर त्या स्वयंतेजानं लकाकणाऱ्या शलाका होत्या. स्त्रियांची कामगिरी अशी डोळ्याआड होण्यामागे कारण असते ती आपल्या समाजातली पुरुषप्रधान व्यवस्था. पितृसत्ताकता. पुरुष हा कर्ता. स्त्री केवळ साधन किंवा सहाय्यक. पुरुषी वर्चस्वाच्या या संस्काराचा स्त्रियांवरही प्रभाव असतो. हिंदी सिनेमातल्या आईचा हा डायलॉग आपण अनेकदा ऐकलेला आहे. ती मुलाला म्हणते 'वो तेरे बच्चे की मा बननेवाली है.' बच्चा खरंतर दोघांचा. त्यातही ते बाळ आकार घेणार, नऊ महिने सांभाळलं जाणार आईच्या उदरात. पुढंही त्याला दूध पाजणार, काळजी घेणार आई. त्याचा मालक मात्र पिता. बाळाला नाव लागणार त्याचंच. आई केवळ साधन. बाळाला जन्म देणारं. या पुरुषी वर्चस्वाच्या दृष्टीमुळेच जगभरच्या स्त्रियांचे श्रम, पराक्रम कायम धूसर राहिलेत. ज्यांचा अपवादाने उल्लेख होतो, त्यांना 'मर्दानी' ठरवलं जातं. 'खूब लड़ी मर्दानी वह तो झाँसी वाली रानी थी' हे गीत आपण ऐकलंच आहे. झाशीच्या राणीचा पराक्रम तिचा स्वत:चा, एका 'स्त्री'चा होता. तिला 'मर्दानी' ठरवलं की सर्वसामान्य स्त्रीच्या आवाक्यातली ही बाब नाही, स्त्रीचा हा गुण असू शकत नाही, अपवादानेच पुरुषी ताकदीच्या स्त्रिया असतात, हा संस्कार घट्ट होतो.

या संस्काराशी लहानपणापासून झगडत आपलं स्वत्व टिकवणाऱ्या आणि पुरुषांच्या बरोबरीनं राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटवणाऱ्या 'फाऊंडींग मदर्स' अनेक आहेत. त्यातल्या संविधानसभेत सदस्य म्हणून निवडून आलेल्या १५ जणी होत्या. त्यांचं जीवन, विचार आणि कार्य आपण थोडक्यात समजून घेणार आहोत. स्वातंत्र्य चळवळीतल्या आपल्या महान मातांच्या आठवणींचा हा जागर या १५ जणींपुरताच मर्यादित असणार आहे.

या १५ जणींची नावं अशी आहेत: केरळच्या पालघाट जिल्ह्यातल्या अम्मू स्वामिनाथन, कोचिनच्या दाक्षायणी वेलायुधन, पंजाबच्या मलेरकोटला इथल्या बेगम ऐजाज रसूल, आंध्रच्या दुर्गाबाई देशमुख, बडोद्याच्या हंसा जीवराज मेहता, लखनौच्या कमला चौधरी आणि राजकुमारी अमृत कौर, गोलपाडा–आसामच्या लीला रॉय, पूर्व बंगालातल्या (म्हणजे आजच्या बांगला देशातल्या) मालती चौधरी, अलाहाबादच्या पूर्णिमा बॅनर्जी आणि विजयालक्ष्मी पंडित, मालदा–प. बंगालच्या रेणुका रे, हैदराबादच्या सरोजिनी नायडू, अंबाला–हरयाणाच्या सुचेता कृपलानी, तिरुवनंतपुरम–केरळच्या ॲनी मस्कारेन. ...अशा या पंधरा जणी.

भारताच्या संविधानसभेत एकूण सदस्य होते २९९. त्यांत या १५ जणी. म्हणजे पाच टक्के. म्हणजे अल्पसंख्य. समाजात निम्म्या असलेल्या महिला देशाच्या भविष्याचा आराखडा निश्चित करण्याच्या या सर्वोच्च प्रक्रियेत अगदी अल्प. हा स्त्रियांना दुय्यम लेखणाऱ्या आपल्या सामाजिक व्यवस्थेचाच परिणाम. यांमध्ये अनुसूचित जाती, मुस्लिम आणि ख्रिस्ती या गटातून प्रत्येकी एक. अनुसूचित जमातीपैकी एकही नाही. बाकी कथित उच्चवर्णीय हिंदू. संविधान सभेच्या महत्वाच्या सर्व समित्यांत त्यांना संधी मिळाली असं झालं नाही. घटनेच्या मसुदा समितीत तर एकही स्त्री नव्हती. देशाच्या विविध भागांतून त्या निवडून आल्या होत्या. बहुतेकजणी सुखवस्तू घरातल्या आणि प्रभावशाली, राजकारणी पुरुषांच्या नातेवाईक होत्या. पण कठपुतळ्या नव्हत्या. त्या स्वयंप्रज्ञ होत्या. उच्चशिक्षित होत्या. पारंपरिक बंधनांना किंवा वहिवाटीला तसेच स्वत:च्या जात–धर्म–वर्ग थरातल्या संकेतांना ठोकरण्याची

त्यांच्यात हिंमत होती. त्यांची स्वत:ची अशी देशाच्या भवितव्याविषयी मतं होती. समाजात नेत्या म्हणून त्यांना मान्यता होती. पारतंत्र्याविरोधात लढताना त्यांनी तुरुंगवास भोगलेला होता. संविधान सभेत येण्यापूर्वी, संविधान सभेत असताना आणि त्यानंतरही त्यांनी कर्तृत्व गाजवलेलं आहे. कोणी मुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री तर कोणी राज्यपाल झालेल्या आहेत. कोणी आंतरराष्ट्रीय स्तरावर युनोसारख्या संस्थांत कामगिरी केलेली आहे.

दाक्षायणी वेलायुधन या संविधान सभेतल्या एकमेव अनुसूचित जातीच्या महिला सदस्य. केरळातील पुलाया या अनुसूचित जातीत जन्मलेल्या. या जातीतल्या स्त्रियांना चोळी घालायला मनाई होती. तो दंडनीय अपराध होता. दलितपणाचे भोग भोगलेल्या दाक्षायणी वेलायुधन दलितांच्या नेत्या होत्या. तथापि, दलितांच्या विकासासाठी स्वतंत्र मतदारसंघ, संयुक्त मतदारसंघ वा विशिष्ट टक्के राखीव जागा हा मार्ग त्यांना मंजूर नव्हता. त्यांच्या मते जोवर दलित आर्थिकदृष्ट्या गुलाम आहेत तोवर या तऱ्हेच्या मार्गांचा काहीही उपयोग होणार नाही. सामाजिक दुर्बलता घालविणारे तसेच नैतिक संरक्षण कवच देणारे संरचनात्मक बदल त्यासाठी त्यांना गरजेचे वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी या दोहोंच्या समर्थक असलेल्या दाक्षायणींचा बाबासाहेबांशी इथे मतभेद होता. अन्य बाबतीत त्या बाबासाहेबांच्या बाजूनं उभ्या राहिलेल्या दिसतात.

बेगम ऐजाज रसूलही स्वत: मुस्लिम लीगच्या प्रतिनिधी असतानाही अल्पसंख्यांकांच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या विरोधात होत्या. त्यांच्या मते हे आत्मघातकी पाऊल आहे. त्यामुळे अल्पसंख्याक बहुसंख्याकांपासून कायमस्वरुपी अलग पडतील. जिनांच्या पाकिस्तानच्या कल्पनेशी त्या सहमत नव्हत्या. राज्यघटनेत 'गाव की व्यक्ती' एकक मानायचं, यावरुन घमासान चर्चा झाली.

बाबासाहेब आंबेडकरांच्या 'खेडे म्हणजे स्थानिकतावाद, अज्ञान, संकुचितता आणि जातीय, धार्मिक असहिष्णुतेचे डबके' या विधानावरुन वातावरण तापलं. अनेकांनी बाबासाहेबांवर यावेळी कठोर टीका केली. त्यावेळी बाबासाहेबांना बेगम रसूल यांनी संपूर्ण पाठिंबा दिला. भारतीय संघराज्याचं गाव नव्हे तर व्यक्ती हे एकक हवं, या मताच्या त्या पुरस्कर्त्या होत्या. वैयक्तिक पातळीवर जमीनदार कुटुंबातल्या असतानाही जमीनदारी निर्मूलनाच्या बाजूनं त्या लढल्या.

स्वतंत्र बाण्याच्या या महिला सदस्य स्त्रियांच्या राजकीय आरक्षणाला विरोध करतात. हंसा मेहता संविधान सभेत म्हणतात, "आम्ही कधीच कोणत्या अग्रहक्कांची मागणी केलेली नाही. आम्हाला सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय न्याय हवा आहे. आम्हाला अशी समानता अभिप्रेत आहे ज्याचा परस्पर आदर, सामंजस्य हा पाया असेल." रेणुका रे यांनी या म्हणण्याला पाठिंबा दिला. हिंदू कोड बिलाच्या चर्चेवेळी दुर्गाबाई देशमुख, हंसा मेहता आणि राजकुमारी अमृत कौर यांनी समान नागरी कायद्याची बाजू लावून धरली. या कायद्यानं सर्व क्षेत्रात स्त्रियांना समानता मिळायला मदत होईल, असा त्यांचा दावा होता. हंसा मेहता युनोच्या मानवी अधिकारांच्या सार्वत्रिक घोषणापत्र समितीच्या सहअध्यक्ष होत्या. त्यावेळी घोषणापत्रात 'all men' ऐवजी 'all human beings' या दुरुस्तीत त्यांचं मोठं योगदान झालं. केवळ पुरुष का? स्त्रिया किंवा अन्य लिंगांचीही माणसं त्यात आहेत, हे संबोधनातूनच स्पष्ट व्हावं. म्हणून 'सर्व पुरुष' ऐवजी 'अखिल मानवजात' ही त्यांची सूचना होती.

मूलभूत अधिकारांच्या उपसमितीतील चर्चेत मिनू मसानी यांनी 'केवळ धर्म वेगळे ही बाब नागरिकांसाठी लग्नात अडथळा होता कामा नये' हा मुद्दा स्विस घटनेतल्या कलमाचा आधार देऊन मांडला. यावर मतदान झालं. डॉ. आंबेडकर, हंसा मेहता, राजकुमारी कौर यांनी पाठिंबा दिला. मात्र ५:४ मतांनी या सूचनेचा पराभव झाला. आपल्या समितीच्या कक्षेबाहेरचा हा मुद्दा आहे, हे विरोधकांनी दिलेलं कारण होतं. पुढं १९५४ साली विशेष विवाह कायदा आल्यावर या उणीवेची बरीचशी भरपाई झाली. धर्म न बदलता लग्न करण्याचा मार्ग मोकळा झाला.

या सर्वांनी त्यांच्या काळात जे म्हटलं वा केलं त्यातला हेतू आज गैरलागू झालेला नाही. तथापि, त्यांचे बदलाच्या गतीचे जे होरे होते, ते सगळेच प्रत्यक्षात आले नाहीत. उदा. महिलांना राजकीय आरक्षणाची गरज तेव्हा त्यांना वाटली नाही. स्वबळावर तसेच सहकारी पुरुषांच्या विवेकबुद्धीने महिलांचे न्याय्य राजकीय प्रतिनिधीत्व साकारेल असं त्यांना वाटलं. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी

(पान ३४ वर)

आदरांजली

मोहन हिराबाई हिरालाल: स्वयंशासनाचे प्रणेते

ए के शिबुराज

दिल्ली आणि मुंबई या गजबजलेल्या राजधान्यांमध्ये, केंद्रीय प्रशासन आहे. मात्र, महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा–लेखा या आदिवासी गावात, ”आमच्या गावात आम्हीच सरकार” ही घोषणा केवळ घोषणा नाही तर ते एक मूर्तिमंत वास्तव आहे. हे तत्त्वज्ञान गोंड आदिवासी समाजाच्या स्वयंनिर्णयाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या राजकीय जाणीव आणि लोकशाही भावनेला मूर्त रूप देणारे आहे. या गावाच्या स्वयंशासनाच्या प्रयत्नात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे मोहन हिराबाई हिरालाल हे सामाजिक कार्यकर्ते या चळवळीच्या अग्रभागी होते. २३ जानेवारी, २०२५ रोजी त्यांचे निधन होईपर्यंत, ‘‘आमचे गाव - आम्ही सरकार’’ या मोहिमेत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

जनशक्तीसाठी आजीवन वचनबद्धता

जयप्रकाश नारायण यांच्या छात्र युवा संघर्ष वाहिनीचे सक्रिय सदस्य आणि गांधीवादी आणि विनोबा भावे यांच्या जनशक्ती संकल्पनेचे कट्टर पुरस्कर्ते, मोहन हिराबाई हिरालाल यांनी १९८४ मध्ये गडचिरोलीत ‘वृक्षमित्र‘ ची स्थापना करून आपल्या कार्याला सुरुवात केली. ग्रामस्वराजच्या व्यावहारिक मॉडेल्सचा शोध त्यांना मेंढा–लेखा येथे घेऊन गेला, जिथे त्यांच्या समोर गावातील अनोखे सहमती लोकशाही मॉडेल आले. या मॉडेलची परिवर्तनीय क्षमता ओळखून, त्यांनी ते आपल्या अभ्यासाचे क्षेत्र म्हणून निवडले आणि ते विकसित करण्यात सक्रियपणे योगदान दिले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली, ‘वृक्षमित्र‘ने महिलांचा सहभाग, संयम, वनसंवर्धन, वन हक्क, भ्रष्टाचार विरोधी उपाय, सांस्कृतिक हक्क, युवा सक्षमीकरण, शाश्वतता आणि समानता यावर लक्ष केंद्रित करून लोकशाही प्रयोगांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या. या एकत्रित प्रयत्नामुळे मेंढा–लेखा आणि मार्दा गावांनी २००६ च्या वन हक्क कायद्यांतर्गत २००९ मध्ये सामुदायिक वन हक्क मिळवले. २०१६ मध्ये जेव्हा त्यांना रचनात्मक कार्यासाठी जमनालाल बजाज पुरस्कार मिळाला तेव्हा त्यांच्या योगदानाची दखल घेतली गेली.

देवाजी तोफा आणि मोहन हिराभाई हिरालाल: एक परिवर्तनशील साथ

गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून ३० किलोमीटर अंतरावर असलेले मेंढा–लेखा शांतता आणि अहिंसा स्वीकारून आजूबाजूच्या ‘नक्षलग्रस्त‘ भागापासून आपले वेगळेपण जपते आहे. मोहन हिराबाई हिरालाल यांच्या आगमनाच्या खूप आधी, गावातील एक निर्विवाद नेता, देवाजी तोफा यांनी १९८७ मध्ये स्वयंशासन पद्धती सुरू केल्या होत्या. तोफा, गावाच्या आजूबाजूच्या १,८०० हेक्टर जंगलाशी खोलवर जोडलेले, एक करिष्माई वक्ता आणि संघटक होते ज्यांनी आपल्या समुदायाचे अहिंसक आंदोलन आणि आदिवासी हक्कांसाठी अतूट बांधिलकीने नेतृत्व केले.

मोहन हिराबाई हिरालाल आणि तोफा यांच्यातील समन्वयाने मेंढा–लेखाला सहभागी लोकशाहीचे जागतिक उदाहरण बनवले. एकेकाळी बाहेरील पँट आणि शर्ट घालणाऱ्या लोकांपासून सावध राहणाऱ्या गावकऱ्यांनी, एका आत्मविश्वासपूर्ण समुदायात विकसित होऊन त्यांच्या अतूट भावना आणि नाविन्यपूर्ण प्रशासन मॉडेलसाठी जगभरात लक्ष वेधले.

सर्वसहमतीची लोकशाही आणि ग्रामस्वराज

पारंपारिक प्रातिनिधिक लोकशाहीला आव्हान देणाऱ्या व्यवस्थेद्वारा ग्रामसभेच्या हातात सत्ता देऊन सर्वसहमती लोकशाहीने मेंढा–लेखाचे कामकाज चालते. अल्पसंख्याकांच्या मताकडे दुर्लक्ष केले जाणार नाही याची खात्री करून, सहमती होईपर्यंत व्यापक चर्चेद्वारे बहुसंख्य–शासन व्यवस्थेपेक्षा आगळे निर्णय घेतले जातात. हा दृष्टीकोन परस्पर विश्वास आणि सर्वसमावेशकता वाढवतो, गांधींच्या ग्रामस्वराजच्या (ग्राम स्वशासन) दृष्टीला मूर्त रूप देतो.

१९८८ पासून, मेंढा–लेखाने सर्व ज्येष्ठ ग्रामस्थांच्या सहभागाने ग्रामसभेत सर्वसहमतीवर आधारित निर्णयप्रक्रियेचा वापर केला आहे. गावात जिथे ८०% जंगल जमीन आहे, १०० पेक्षा कमी कुटुंबांचा समावेश आहे, तिथे पूर्ण सहभाग शक्य आहे. निर्णय घेण्याची शक्ती नसलेली बाहेरील लोकांसाठी खुली असलेली

अभ्यासगटासारखी अतिरिक्त समिती, गंभीर विषयांवर माहिती गोळा करते. या चर्चेतून ग्रामस्थांना लोकशाही, शासन आणि शाश्वत विकास याबाबत स्पष्टता मिळाली. पर्यावरण संवर्धनासाठीच्या त्यांच्या वचनबद्धतेने त्यांना अवैध वृक्षतोडीसाठी दंड ठोठावण्यास प्रवृत्त केले आणि संपूर्ण देशासाठी एक उदाहरण ठेवले.

वन हक्कांसाठी लढा

शतकानुशतके, आदिवासी समुदाय त्यांच्या उपजीविकेसाठी जंगलांवर अवलंबून आहेत, हा हक्क १९५०च्या निस्तार हक्क जाहीरनाम्यामध्ये मान्य करण्यात आला आहे. तथापि, वन आणि महसूल विभागांच्या नोकरशाहीच्या हस्तक्षेपामुळे हे अधिकार डावलले जातात. मेंढा–लेखाने अत्यंत सूक्ष्म अभ्यास आणि चळवळीद्वारे या अन्यायाला आव्हान दिले, आणि शेवटी त्यांच्या समुदायाची वन संसाधनांवर स्वायत्तता सुरक्षित केली. आज कोणतीही सरकारी संस्था ग्रामसभेच्या मान्यतेशिवाय गावात कोणताही प्रकल्प हाती घेऊ शकत नाही. त्यांचा शांती आणि शाश्वतता स्वीकारताना बाह्य शोषणाचा प्रतिकार करण्याचा दृष्टीकोन चिपको चळवळीची भावना प्रतिबिंबित करतो.

त्यांचा सर्वात उल्लेखनीय संघर्ष म्हणजे शोषण करणाऱ्या बांबू कापण्याच्या शोषक करारांविरुद्धचा संघर्ष. १९९१ मध्ये, जेव्हा सरकारने कागदी गिरण्यांना नगण्य खर्चात बांबू काढण्याची परवानगी देण्याच्या कराराचे नूतनीकरण केले, तेव्हा ग्रामसभेने त्यास विरोध केला. त्यांनी मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, त्यांना स्वतःच्या बांबू संसाधनांचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार मिळावेत. त्यांच्या याचिकेकडे दुर्लक्ष केल्यावर त्यांनी चिपको स्टाईल आंदोलन सुरू केले. तीन वर्षे सरकार आणि पेपर कंपनीने त्यांचा प्रतिकार दडपण्याचा प्रयत्न केला, पण गाव ठाम राहिले. अखेरीस, सरकारने मान्य केले, संयुक्त वन व्यवस्थापन अधिकार दिले आणि बांबूच्या विक्रीवर गावकऱ्यांच्या अटींवर वाटाघाटी केली जाईल याची ग्वाही दिली.

मेंढा–लेखाने वन हक्क कायदा (२००६) अंतर्गत वनहक्क वापरणारे पहिले भारतीय गाव म्हणून इतिहास घडवला. एका प्रतिकात्मक क्षणी, तत्कालीन केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री जयराम रमेश यांनी देवाजी तोफा यांच्याकडे पहिला ट्रान्झिट पास सुपूर्द केला आणि घोषणा केली, "आज बांबू आझाद आहे." या विजयाने तळागाळातील लोकशाहीचा नोकरशाही नियंत्रणावरील विजय अधोरेखित केला.

विकास निधीवर थेट नियंत्रण

आदिवासींच्या विकासासाठी सरकारने भरीव निधीची तरतूद केली असूनही, भ्रष्टाचाराने त्यातील बराचसा भाग लुटला. हे ओळखून ग्रामसभेने त्यांच्या निधीवर थेट नियंत्रण ठेवण्याची मागणी केली. सरकारने सुरुवातीला विरोध केला आणि असा युक्तिवाद केला की ग्रामसभा नव्हेत तर केवळ ग्रामपंचायतीच कायदेशीर संस्था आहेत. ग्रामस्थांनी एनजीओ नोंदणी प्रक्रियेचा अभ्यास करून विरोध केला आणि 'मेंढा–लेखा नियोजन आणि विकास परिषद' म्हणून त्यांची प्रशासन रचना औपचारिक करण्याचा निर्णय घेतला.

ग्रामसभेच्या चौकटीत कार्यरत असलेल्या या परिषदेने सर्व विकासकामांची जबाबदारी घेतली. पारदर्शकता आणि सामूहिक निर्णयाची खात्री करून, दर महिन्याला पौर्णिमेच्या दिवशी दुपारच्या वेळी सभा आयोजित केली गेली. सरकारी अधिकाऱ्यांकडे या मॉडेलला मान्यता देण्याशिवाय पर्याय नव्हता, ज्यामुळे निधी थेट गावात जाऊ शकला. या मूलगामी पावलाने मध्यस्थांचे उच्चाटन केले आणि समाजाला स्वतःच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्याचा अधिकार दिला.

मेंढा–लेखाची जागतिक प्रासंगिकता

मेंढा–लेखाच्या यशाचे अंशतः श्रेय तिची आदिवासी संस्कृती, कमी लोकसंख्या आणि घनिष्ठ सामाजिक रचना आहे. तथापि, मेंढा–लेखाची तत्त्वे -समुदाय–नेतृत्वाखालील शासन, विकेंद्रित निर्णय घेणे, नोकरशाहीच्या वर्चस्वाला प्रतिकार आणि पर्यावरणीय कारभारीपणा -जगाला मौल्यवान धडे देतात. आधुनिक प्रशासनाच्या मर्यादांना वाढते केंद्रीकरण, बाजार–चालित धोरणे आणि सामाजिक–आर्थिक असमानतेच्या युगात मेंढा–लेखा गावाचे मॉडेल आव्हान देते.

मेंढा–लेखामध्ये प्रचलित असलेली सर्वसहमतीची लोकशाही, अल्पसंख्याकांना कधीही दुर्लक्षित केले जाणार नाही याची हमी देते आणि निर्णयप्रक्रियेतील संवादाद्वारे मानवी संबंध बळकट करते. वैयक्तिक फायद्यापेक्षा सामूहिक हिताला प्राधान्य देऊन, मेंढा–लेखा श्रेणीबद्ध सत्ता संरचना आणि राजकीय घराणेशाहीला पर्याय देते. दैनंदिन संवाद हा सामाजिक विभाजन

(पान १३ वर)

आदरांजली

संत गाडगेबाबा: शेवटचे विद्रोही कीर्तनकार

श्रीकांत ढेरंगे

जेथे करावे कीर्तन। तेथे अन्नही न सेवावे
माळ घालू नये गळा। बुका लावू नये भाळा
तट्टावृषभासी दाणा। तृण मागो नयें जना
तुका म्हणे द्रव्य घेती। देती ते ही नरका जाती

कीर्तन करणाराची व्याख्याच जर तुकोबा इतकी कठोरपणे करत असतील, तर तुकोबांच्या प्रबोधनाची भाषा किती कठोर असेल? वारकरी प्रबोधन परंपरेचं भांडवलीकरण कुणी वा कसं केलं हा मुख्य विषय आहे. कुणी जर देवाच्या वा संप्रदायाच्या नावाखाली सुरू असलेल्या भांडवलीकरणाची वा दुकानदारीची खिल्ली उडवत असेल, तर त्यात राग येण्याचं वा वाईट वाटण्याचं काय कारण आहे? विठोबा सर्वांचा आहे. आपल्या मालकीचा तर आपला देहही नाहीये.

गावोगाव हरिनाम सप्ताह सुरू झाले आहेत. एरव्हीही ते होतच असतात. शेतीच्या प्रश्नांबद्दल, दुधाच्या प्रश्नाबद्दल, दुष्काळाने होरपळून निघणाऱ्या लोकांबद्दल, वाढती बेरोजगारी, सरकारी हुकूमशाहीबद्दल, स्त्रिया, दलित, आदिवासी किंवा सामाजिक तेढ निर्माण करण्याबद्दल, सर्व प्रकारच्या महागाईबद्दल, महाराष्ट्रातून उद्योगधंदे इतर फक्त आणि फक्त गुजरातमध्ये पळवून करण्याबद्दल, इव्हीएमबद्दल, परभणीत झालेल्या जातीय अत्याचारांबद्दल, बीडमधील अपहरण करून अमानवी अशा पद्धतीने केल्या गेलेल्या खुनाबद्दल वा अशा सर्व प्रकारच्या मानवी क्रूरतेबद्दल, अशा सर्व प्रश्नांबद्दल कीर्तनकार बोलणार नाहीत. ते भलतेच अजेंडे घेऊन गावोगाव पाकिटे घेत आपला गल्ला भरतील. उपस्थित श्रोतेदेखील विचारात पडत नाहीत याविषयी. हा सखेद. जेवणावळी नसतील तर कीर्तनांना किती गर्दी होईल? कितीतरी कोटींचा खर्च असतो. दहा गावांनी ठरवलं तर एक मोठं हॉस्पिटल या खर्चात सुरू होऊ शकतं.

"बुडती हे जन न देखवे डोळा ।म्हणोनि कळवळा येत असें'' हे तुकोबांच्या कीर्तनाचं सूत्र होते. त्यांचे पूर्वसुरी वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे या संप्रदायाचे प्रवर्तक संत नामदेव यांचे सूत्र होते, "नाचूं कीर्तनाचे रंगी ।ज्ञानदीप लावूं जगी'' देश भयाण अवस्थेतून चालला आहे. त्यावेळी प्रबोधन करणारांची जबाबदारी अधिक आहे. यावर्षी एखाद्या भागात दुष्काळ आहे म्हणून कुणा कीर्तनकाराने पाकिट नाकारले आहे. अशी बाब ऐकिवात नाही. अपवाद एकदोन असतील. पण फक्त एकदोनच. या पलीकडे नाही.

संत गाडगेबाबा गावोगाव कीर्तन करायचे. ज्या गावात जायचे तिथे ते संपूर्ण गाव स्वच्छ करायचे. नदीवर जायचे. अंघोळ करायचे. स्वत:ची कपडे धुवायचे. ती वाळवून गावात येऊन भाकरतुकडा मागायचे. मग जेवण करायचे. उरलेले अन्न गायवासराला, कुत्र्यामांजराला किंवा मग एखाद्या अनाथाला, गरिबाला द्यायचे. आणि मग रात्री कीर्तन.

काय कीर्तन करायचे बाबा. समोर उपस्थित सगळे शेतकरी, कष्टकरी. शेतकऱ्यांना विचारायचे काय पिकवलस यंदा? शेतकरी म्हणायचा, 'बाजरी, ज्वारी, मठहुळगे जे पिकतं ते. 'कुणाला विकलं'? शेतकरी उत्तर द्यायचे 'व्यापाऱ्याला'. बाबा म्हणायचे, 'मग भाव कोणी ठरवला?' शेतकरी उत्तर द्यायचे, 'व्यापाऱ्याने. बाबा पुन्हा प्रश्न विचारायचे, 'तेल मीठ गूळ आणतो का घरी?'

शेतकरी म्हणायचे, होय. मग बाबा म्हणायचे, "तेलमीठगूळाचा भाव कोणी ठरवला?" शेतकरी म्हणायचे, 'दुकानदाराने.' मग बाबा पुन्हा प्रश्न विचारायचे, तूच पिकवतोस. ते पिकलेलं परत दुकानातून तूच आणतोस. तुझ्या पिकाचा भाव ठरवायचा अधिकार तुलाच नाही. कसले रे कास्तकार तुम्ही? तू भाव ठरवत नाहीस म्हणून तुझं हे अठराविश्व दारिद्रय. शिक्षण नाही. घोर अज्ञान तुझं. म्हणून हे दारिद्रय. अशा सुप्त विद्रोहाला वाट मोकळी करून देणारे शेवटचे कीर्तनकार होते बाबा!

आज काय आहे? गावोगाव जेवणावळी उठवण्याची स्पर्धाच सुरू आहे जणू. वर्षभर आधी किंवा साताठ महिने आधीच कीर्तनकारांच्या तारखा बुक असतात. असं बुकिंग असणं म्हणजे

काय अर्थ घ्यायचे याचे? हे Advance Booking ही संकल्पनाच पूर्णपणे भांडवलदारी व्यवस्थेतून आलेली आहे. ज्या तुकोबांनी आपल्या सावकारकीची सगळी कर्जखते इंद्रायणीत बुडवली, दुष्काळात स्वत:च्या घराचे धान्य उपाशी जनतेत वाटून दिले. धर्मांधांच्या असंख्य यातनांना तोंड दिले. त्यांच्या अभंगांवर निरूपण करण्यासाठी Advance Booking होतय. किती हास्यास्पद आणि विषाद वाटणारी ही गोष्ट आहे. हे Advance असणे म्हणजेच मोह आहे. याविषयी परखडपणे इथे लिहिले आहे. ही एकूण महाराष्ट्राच्या प्रबोधनपरंपरेची अधोगतीच आहे. याचे कुणाला फार वाईट वाटण्याचे कारण नाही. आणि वाटलेच तर तुकोबांच्या शिकवणीच्या वारश्याला पुढे नेण्याचा अभिमानच आहे. कीर्तनकार न म्हणता निरूपणकार किंवा रसग्रहणकार असं म्हणायला हवय. कारण, पदरचा एकही अभंग नसतो. दुसऱ्याच्या कवितेवर चिंतन मांडलेले असते. असो.

तुकोबा लिहितात,

"सत्य आंम्हा मनीं । नव्हे गाबाळाचे धनी
ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध आशंका मळ
देतो तीक्ष्ण उत्तरे । पुढे व्हावयासी बरें
तुका म्हणे बरे घडे । देशोदेशी चाले कोडें

तुकोबा म्हणतात आमच्या मनात सत्य काठोकाठ भरलेले आहे. सत्य हाच आमचा परमेश्वर आहे. आम्ही इतर कुठल्याही गाबाळाचे किंवा केरकचऱ्याचे धनी होऊ इच्छित नाहीत. तशा प्रकारच्या मालकीची आम्हाला काही गरजही नाही. म्हणून तुम्ही या भावना समजून घ्या. आणि जे जे शुद्ध आहे ते स्वत:मध्ये भरून घेऊन तुमच्यात उरलेला मळ, घाण टाकून द्या. पुढे सर्वांचे भले होण्यासाठी तुकोबा असे परखड आणि कठोर शब्दांमध्ये व्यक्त होतात. ते म्हणतात की, या सगळ्यातून तुमचे चांगले झाले, तर तुमचेच सगळीकडे, गावोगावी कोडकौतुक केले जाईल.

तुकोबांचे वारस म्हणून हा वारसा पुढे नेण्यासाठी कटिबद्ध राहणे म्हणूनच महत्त्वाचे आहे. सामाजिक सद्यस्थिती फारच वाईट आहे. द्वेषाचाच सोस सगळीकडे माजलेला आहे. आणि प्रबोधनाच्या नावाखाली काय काय सुरू असतं हे सांगायची फार गरज वाटत नाही. या सगळ्यापुढे महाराष्ट्रधर्म हा शब्द फार मोठा आहे. महाराष्ट्र या धर्मापुढे इतर सगळ्या गोष्टी मला क्षीण वाटतात.

'एक मेका साह्यं करूं ।अवघे धरू सुपंथ'

गाडगेबाबांना विनम्र अभिवादन !

९६७३१९५७५१

(आदरांजली: पान ११ वरुन)

कसे दूर करू शकते आणि खरोखरी सहभागी लोकशाही कशी वाढवू शकते याचा हा पुरावा आहे.

पर्यावरणीय संकट आणि वाढत्या असमानतेच्या युगात, मेंढा–लेखा हे शाश्वत आणि न्याय–चालित शासनाचा दिपस्तंभ म्हणून उभे आहे. degrowth (वाढ), परस्परावलंबन आणि विकेंद्रित संसाधन व्यवस्थापन या संकल्पना त्यांच्या यशाच्या प्रकाशात नवीन अर्थ प्राप्त करतात. जग विद्यमान व्यवस्थांच्या मर्यादांशी झुंजत असताना, मेंढा–लेखा, जिथे लोक त्यांच्या जीवनावर आणि समुदायांवर नियंत्रणाचा पुन्हा दावा करतात, भविष्यासाठी एक आशादायक मिसाल समोर ठेवते.

देवाजी तोफा यांचे नेतृत्व आणि मोहन हिराबाई हिरालाल यांच्या अतूट बांधिलकीने प्रेरित होऊन या गावाने खऱ्या अर्थाने मुक्त होणे म्हणजे काय याची पुन्हा व्याख्या केली आहे. मेंढा–लेखा हे केवळ एक गाव नाही - ती एक चळवळ आहे, एक तत्वज्ञान आहे आणि कृतीशिल स्वयंनिर्णयाचे जिवंत उदाहरण आहे.

अनुवाद : सिरत सातपुते
satputesirat@gmail.com

टिप्पणी

‘आम्ही अतिरेकी आहोत?’ अरुणाचल प्रदेशात स्थानिकांचा संताप

रोकिबुझ जमान

“ते येथे निमलष्करी दल कसे पाठवू शकतात?” तागा तमुकने विचारले. त्यांनी मला अरुणाचल प्रदेशातील सियांग जिल्ह्यातील रियु गावातील सरकारी प्राथमिक शाळा दाखवली. इमारत पडीक आणि मोडकळीस आली होती, आतमध्ये डेस्क किंवा बेंचही नव्हते. शाळेत एकाही मुलाची नोंदणी झाली नाही आणि शेवटचे काही वर्ग महिन्यांपूर्वी घेण्यात आले होते.

अरुणाचल प्रदेशच्या सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या सरकारने या वास्तूचे सशस्त्र केंद्रीय दलांच्या छावणीत रूपांतरित करण्याचे निर्देश जारी केल्याचे ऐकेपर्यंत गावाचे या जीर्ण वास्तूकडे लक्षही नव्हते.

अरुणाचल प्रदेशातील या दुर्गम, पोहोचण्यास कठीण गावात केंद्रीय सैन्य का पाठवले जात होते? तमुक म्हणाले, ”आम्ही चिनी, पाकिस्तानी किंवा अतिरेकी नाही. आमच्या गावात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्नही नाही. मग ते सैन्य कसे पाठवतील?”

सियांग जिल्ह्याच्या उपायुक्तांच्या स्वाक्षरीच्या ६ डिसेंबर रोजीच्या एका पत्राने राज्य सरकारची योजना उघडकीस आली. रहिवाशांचा तीव्र विरोध असतानाही सियांग नदीवरील भारतातील सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पाचे सर्वेक्षण केले जाऊ शकते याची खात्री देण्यासाठी सैन्य पाठवले जात होते.

ब्रह्मपुत्रेची मुख्य उपनदी असलेली सियांग तिबेटमधून अरुणाचल प्रदेशात वाहते. अरुणाचल प्रदेशातील रहिवासी अनेक वर्षांपासून सियांगवरील या मेगा–डॅमला विरोध करत आहेत. प्री फिजिबिलिटी सर्वेक्षण करण्याचे यापूर्वीचे प्रयत्नही फसले होते.

“आम्ही विरोध करू नये म्हणून सशस्त्र दलांना आमचे मनोबल कमी करण्यासाठी आणि घाबरवण्यासाठी पाठवले जात आहे,‘‘ जवळच्या कोमकर गावातील शेतकरी ओपांग बोको म्हणाले. ‘‘त्यांना माहित आहे की लोक सियांगवर धरण स्वीकारणार नाहीत. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा निषेध किंवा प्रतिकार थांबवायचा आहे.‘‘

सशस्त्र दल पाठवण्याचा प्रस्ताव केवळ सियांग जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. सियांग, अप्पर सियांग आणि ईस्ट सियांग या तीन जिल्ह्यांच्या उपायुक्तांना राज्याच्या गृह विभागाने पाठवलेल्या ९ डिसेंबरच्या पत्रात म्हटले आहे की, ‘‘सियांग अप्पर बहुउद्देशीय प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य दल आणि महिला पोलिसांसह केंद्रीय सशस्त्र दलाच्या नऊ कंपन्या” तैनात केल्या जातील.’’

शासनाच्या या निर्णयामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. १५ डिसेंबरपासून, सियांगच्या किनाऱ्यावरील गावांमधील रहिवाशांनी केंद्रीय सैन्याच्या संभाव्य तैनाती विरोधात “सर्वेक्षण नाही, धरण नाही, सैन्य नाही‘‘ अशा घोषणा देऊन किंवा फलक घेऊन अनेक निदर्शने केली आहेत.

तामुक यांचे म्हणणे आहे, ”आम्ही आमच्या स्वत:च्या जमिनीबद्दल खूप संवेदनशील आहोत. आमच्याकडे एवढेच आहे. आणि आम्ही ते गमावू शकत नाही. सशस्त्र दलांच्या संरक्षणाखाली करण्यात आलेले धरण स्थळांचे कोणतेही जबरदस्तीने सर्वेक्षण केल्यास हिंसाचार भडकू शकतो.”

सियांग अप्पर बहुउद्देशीय प्रकल्प प्रथम २०१७ मध्ये केंद्र सरकारचे थिंक टँक नीति आयोगाने प्रस्तावित केला होता. २०२२च्या भारतीय आंतर–मंत्रालयीन तांत्रिक समितीच्या अहवालानुसार, यारलुंग त्सांगपो नदीच्या वरच्या बाजूला विकसित होत असलेल्या चिनी जलविद्युत प्रकल्पांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याचा सामना करण्यासाठी हे धरण बांधण्यात येणार होते. ब्रह्मपुत्रा किंवा सियांग तिबेटमध्ये तिच्या उगमस्थानी यारलुंग त्सांगपो म्हणून ओळखले जाते.

“जलविद्युत निर्मिती हे बहुउद्देशीय प्रकल्पाचे उप–उत्पादन आहे. ‘आदि’ समाजाला वाचवणे हा प्रकल्पाचा खरा उद्देश आहे.”अशा शब्दांत मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी देखील अद्याप बांधलेही न गेलेल्या धरणाचा बचाव सियांग खोऱ्यात राहणाऱ्या ‘आदि’ जमातींचे ६० हजार मेगावॅटच्या चिनी धरणापासून संरक्षण करण्याचा एक मार्ग म्हणून केला आहे.

खांडू यांनी दावा केला की, "प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात येणाऱ्या अनेक जलसाठ्यांमधील पाणी तिबेट आणि इतरत्र कोरड्या प्रदेशात वळवण्याचा, आंतरराष्ट्रीय जल करारांवर स्वाक्षरी न करणाऱ्या चीन सरकारचा मानस आहे, ज्यामुळे सियांग मधील पाण्याचे प्रमाण घटेल."

"सियांग अप्पर बहुउद्देशीय प्रकल्प केंद्र सरकारने नदीतील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह वर्षभर टिकवून ठेवण्यासाठी आणि चीनकडून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यास 'पूर नियंत्रण' करण्यासाठी प्रस्तावित केला आहे.'' असेही ते म्हणाले. मात्र या प्रकल्पातून ही दोन्ही उद्दिष्टे कशी साध्य होतील, याचा तपशिल त्यांनी दिला नाही.

तथापि, या भागातील रहिवासी सरकारच्या दाव्याबद्दल साशंक आहेत. त्यांना त्यांची वडिलोपार्जित जमीन आणि राहणीमान गमावण्याची भीती आहे. एका निवेदनात, गावांच्या प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले, "सियांग प्रदेशाच्या जमिनीत सैल गाळाचे खडक आहेत आणि तो ठिसूळ भूकंपप्रवण क्षेत्रात वसलेला आहे, त्यामुळे धरणाची व्यवहार्यता अवैधच ठरते."

आंदोलनाचे नेतृत्व करणारा 'आदि' समुदायातील शेतकऱ्यांच्या समूहाचा, 'दि सियांग इंडिजिनस फार्मर्स फोरम'चा, असा अंदाज आहे की सियांग आणि अप्पर सियांग जिल्ह्यातील सियांग नदीकाठची ४० गावे प्रस्तावित धरणामुळे प्रभावित होतील. 'सियांग इंडिजिनस फार्मर्स फोरम'चे अध्यक्ष गेगोंग जिजॉन्ग यांच्या नुसार सुमारे १३ गावे पाण्याखाली जाणार आहेत. आणखी २७ गावांतील मानवी वस्तीवर थेट परिणाम होणार नसला तरी ती गावे अप्रत्यक्षपणे प्रभावित होतील कारण त्यांची शेतीयोग्य जमीन पाण्याखाली जाईल.

धरण विरोधी कार्यकर्ती भानू ताटक यांच्या नुसार धरण हे 'आदि' जमातींसाठी त्यांच्या अस्तित्वाला असलेला धोका आहे. कारण त्यामुळे पिढ्यानपिढ्या या प्रदेशात एकत्र राहणाऱ्या लोकांना विस्थापित होण्याची भीती आहे. धरण हे इथल्या समृद्ध आणि दुर्मिळ वनस्पती आणि जीवजंतूंसाठीही धोक्याचे आहे असेही त्या स्क्रोलशी बोलताना म्हणाल्या.

जेव्हा स्क्रोलने १७-१८ डिसेंबर रोजी यापैकी अनेक गावांना भेट दिली, तेव्हा धरणाविरोधात तळागाळात रोजच्या बैठका आणि चर्चा होताना दिसल्या तसेच भविष्याबद्दल मोठी चिंताही दिसली. उदाहरणार्थ १८ डिसेंबर रोजी, अप्पर सियांग जिल्ह्यातील गेकू गावात, रहिवाशांनी धरण प्रकल्पाला आपला तीव्र विरोध व्यक्त करण्यासाठी 'आदि' विधी केले. गावातील ४८ वर्षीय शेतकरी ताया एजिंग यांनी सांगितले की, "या विधींमध्ये धरणाच्या बांधकामाला पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींच्या पतन किंवा मृत्यूसाठी शाप देणे आणि प्रार्थना करणे समाविष्ट आहे."

जवळच्या कोमकर गावातील, संगम याओ, या ७० वर्षीय मुख्याध्यापकांनी मरण पावलो तरी आमच्या जमिनीवरून हलणार नाही यावर भर दिला. ज्या दिवशी आम्ही भेट दिली त्या दिवशी गावात एक रॅली काढण्यात आली, मोर्चापूर्वी रहिवाशांनी मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्या पुतळ्याचे दहन केले.

सियांग नदीकाठची गावे

रियु हे टेकडीच्या उतारावरील एक गाव आहे, ज्यात 'आदि' जमातीच्या १७० कुटुंबांची वस्ती आहे. सियांग गावाच्या अगदी खालून वाहते. नदीपासून ५ – ६ किमी उंचीवर घरे असलेले रियुचे रहिवासी त्यांचे अन्न नदीच्या काठावर पिकवतात, संत्री, मोसंबी, आले, वेलची, अननस आणि सर्वात महत्वाचा पुरेसा भात जो त्यांना आत्मनिर्भर बनवतो. प्रस्तावित ११ हजार मेगावॅट धरणामुळे त्यांची बहुतेक शेतजमीन आणि वडिलोपार्जित जमीन वाहून जाईल, असा दावा रियुच्या रहिवाशांनी आणि ग्राम प्रमुखांनी केला आहे.

"आम्ही आमचे संपूर्ण आयुष्य येथे जगलो, मी [माझ्या कुटुंबाची] दहावी पिढी आहे,'' रेनेग टांगू या ६७ वर्षीय महिलेने स्क्रोलला सांगितले. ती तिच्या पारंपारिक छाटलेल्या छताच्या 'आदि' घरातील गोदामात तिच्या व्हरांड्यातून कोरड्या भाताच्या पेंढ्या घेऊन जात होती. ''धरण आमची सर्व जमीन, भातशेती, संत्र्याची झाडे काढून घेईल. काहीजण म्हणतात की धरणामुळे आमची घरेही बुडतील. आम्ही कुठे जाणार?"

"आम्हाला सरपण गोळा करण्यात, आमच्याच गावात फिरताना अडचण येऊ शकते'' असे म्हणत तांगूच्या अनामिक मुलीने शाळेतील सैन्याच्या उपस्थितीबद्दल काळजी व्यक्त केली.

या भागात धरण शक्य आहे की नाही याचे मूल्यांकन करण्यासाठी सियांग नदीकाठच्या उगेंग, दिट्टे डदिम्मे आणि पारॉन्ग

या तीन स्थळांची निवड नॅशनल हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशनने केली आहे. १८ डिसेंबरच्या सकाळी आम्ही रियु येथून नदीच्या पलीकडे असलेल्या पारॉन्गला पोहोचलो तेव्हा, ताबेंग सिरम या ६० वर्षीय शेतकऱ्याने "तुम्ही बुडीत क्षेत्रात आहात.'' या शब्दांत आमचे स्वागत केले!

"६ ऑक्टोबर रोजी सियांगचे उपायुक्त आणि अरुणाचल जलविद्युत विकास विभागाचे मुख्य अभियंता वरिष्ठ अधिकारी या दोघांनी गावाला भेट दिली होती. त्यांनी आम्हाला सांगितले की [जलाशयाची उंची] आमच्या गावातील शाळेएवढी असेल, त्यामुळे आमची शेतं पाण्याखाली असतील," ताबेंग सिरम म्हणाले.

त्यांचा मुलगा दुबिट म्हणाला की, "सरकार त्यांच्यासाठी आखत असलेल्या अशा प्रकारच्या विकास योजनांची त्यांना गरज नाही. दोन महिन्यांत, आम्ही भात पिकवतो आणि भाजीपाला पिकवतो आणि ते वर्षभर पुरतं. आम्हाला विकासाची गरज नाही. आम्हाला पैशाची गरज नाही. आम्ही पैशाशिवाय जगू शकतो. त्यामुळे आम्ही आंदोलन करत आहोत. आमची जमीन, आमचा जीव घेईल अशा धरणांची आम्हाला गरज नाही."

गेकू, पारोंग, कोमकर आणि रियु गावातील ४० हून अधिक रहिवाशांशी बोललो असता, त्यापैकी बहुतेकांनी मोठ्या धरणांवर आक्षेप व्यक्त केला. जलविद्युत प्रकल्पाला केवळ अल्पसंख्याकच विरोध करत असल्याचा सरकारचा दावा त्यांनी फेटाळून लावला.

"जर आमच्यापैकी बहुतेक जण धरणाला सहमती देत असतील तर सरकार सैन्य का पाठवत आहे?" धरणविरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या रियु गावातील रहिवासी तसोंग जामोह यांना विचारले.''लोकांना येथे धरण नको आहे. आमच्याच भूमीसाठी आम्ही मरायला तयार आहोत. हे धरण आम्हाला आमच्याच भूमीत हाजोंग आणि चकमांसारखे निर्वासित बनवेल.''

बहुतांशी बौद्ध असलेले चकमा हे १९६० च्या दशकात अरुणाचल प्रदेशात स्थायिक झाले जेव्हा त्यांचे मूळ वास्तव्य असलेल्या पूर्व पाकिस्तान (आता बांगलादेश) मधील चितगाव पहाडी क्षेत्राचा काही भाग कपताई धरणाच्या पाण्याखाली गेला. त्याच काळात कथित धार्मिक छळामुळे हिंदू हाजोंगांनी पूर्व पाकिस्तानमधून स्थलांतर केले होते.

लोकांमध्ये फूट पडण्याचे प्रयत्न

अशा स्वरूपाच्या प्रकल्पाला वनमंजुरी मिळण्यापूर्वी ग्रामसभांची संमती आवश्यक असताना, नव्याने सुधारित वन (संवर्धन) दुरुस्ती कायदा, २०२३, कोणत्याही वनमंजुरीच्या आवश्यकतेविना केंद्राला भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमेच्या १०० किमीच्या आत धोरणात्मक प्रकल्पांसाठी जंगले वळविण्याची परवानगी देतो.

मागील काही वर्षांत या प्रदेशात अनेक ग्रामसभांच्या बैठका झाल्या असून, गावकऱ्यांनी धरणाला विरोध दर्शवला आहे. तरीही सरकार ठाम आहे. सियांग व्हॅलीतील रहिवाशांनी सांगितले की सरकार आता प्रत्येक गावासाठी तयार करण्यात आलेल्या उपसमित्यांमध्ये भाग घेण्यासाठी काही रहिवाशांना आमंत्रित करून त्यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे.

पारोंग गावातील ग्रामपंचायतीचे निवडून आलेले अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे सदस्य तासो ताबी यांनी स्क्रोलला सांगितले की ७०% गावकरी धरणाच्या विरोधात आहेत तर उर्वरित धरण सर्वेक्षण करण्याच्या बाजूने आहेत. वातावरण अजूनही गरम आहे. प्रकरण तापत आहे.

ताबी यांची स्वत:ची शेतीयोग्य जमीन धरणामुळे बुडणार आहे. मात्र ते सर्वेक्षणाच्या बाजूने होते. त्यांना सर्वेक्षण करून नुकसान भरपाईचा अंदाज द्यायचा होता. "अचूक मोजमाप न झाल्याने किती जमीन पाण्याखाली जाईल हे आम्हाला माहीत नाही. भरपाई पुरेशी आणि योग्य नसेल तर लोक धरणाला परवानगी देणार नाहीत. पण आम्हाला विकास हवा आणि सरकारच्या विरोधात बोललो तर कहां से विकास हो पायेगा? विकास कसा होणार?" ताबी म्हणाले. अजून एक पारोंग रहिवासी आणि भाजप समर्थक तानी तामुत यांनी या प्रकल्पाला होत असलेला विरोध नाकारला. ते म्हणाले, "अनेक जण धरणाला पाठिंबा देत आहेत. हा एक राष्ट्रीय मुद्दा आहे आणि एक भारतीय नागरिक म्हणून आपण तो स्वीकारला पाहिजे आणि त्याचे समर्थन केले पाहिजे. विकास आयेगा तो जमीन तो जायेगा. जर इथे विकास व्हायचा असेल तर जमीन गमावली जाईल."

पारोंग गावचे ग्रामप्रमुख तारोक सिरम यांनी मात्र तामुत अल्पमतात असल्याचा दावा केला. "ज्यांना सर्वेक्षण हवे आहे त्यापैकी बहुतेक लोक सरकारसोबत आहेत किंवा भाजपशी संबंधित

आहेत किंवा त्यांना पैसे हवे आहेत. ते म्हणतात की ते सरकारशी बोलत आहेत जेणेकरून पीडित कुटुंबांना जास्तीत जास्त भरपाई मिळावी. आम्हाला नुकसान भरपाईची गरज नाही, आम्हाला आमच्या वडिलोपार्जित जमीन हवी आहे'' सिरम म्हणाले.

६० टक्के जनता धरण समर्थक असल्याचा भाजप सरकारमधील एका ज्येष्ठ मंत्र्याच्या दाव्याला त्यांनी विरोध केला. "ते पूर्ण खोटे आहे. ९०% हून अधिक गावकऱ्यांना येथे कोणतेही धरण नको आहे," सिरम म्हणाले.

अनेक रहिवाशांना आश्चर्य वाटले की ते त्यांच्या निषेधांमध्ये एकटे का आहेत? विशेषत: आसाममधील प्रवाहाच्या खालच्या भागातील समुदाय सियांग नदीवरील धरणाच्या विरोधात बोलत का नाहीत?

सियांग आसाममधील सादिया येथे दिबांग आणि लोहित नद्यांना मिळते आणि ब्रह्मपुत्रेत वाहते. "आसाम विरोध का करत नाही?'' पारोंग गावातील दोईर एटे सिरम हे शेतकरी, ज्यांचे घर धारण झाल्यास पाण्याखाली जाईल, विचारतात. ६० वर्षीय शेतकरी ताबेंग सिरम सहमती दर्शवताना म्हणतात, ''येथे धरण झाल्यास सुबानसिरी किंवा रंगानदीप्रमाणे ब्रह्मपुत्रा कोरडी पडेल. आणि जर धरण फुटले तर ते आसाम आणि पासीघाटसाठी आपत्तीजनक ठरेल.''

गावकऱ्यांच्या चिंतेशी तज्ज्ञही सहमत असल्याचे दिसून आले. साऊथ एशिया नेटवर्क ऑन डॅम्स, रिव्हर्स अँड पीपलचे हिमांशू ठक्कर म्हणाले की, ठिसूळ भूकंपप्रवण क्षेत्रामध्ये असलेल्या धरणामध्ये प्रवाहाच्या खालच्या बाजूच्या आपत्तीची अधिक संभाव्यता आहे.

ते म्हणाले की हा प्रकल्प चिनी धरणापासून संरक्षण करेल हा राज्य सरकारचा दावा संशयास्पद आहे कारण सियांग वरील धरणाचे स्वत:चे प्रतिकूल परिणाम होतील. सियांगवरील धरणाचा अर्थ असा आहे की जेव्हा जलाशय पावसाळ्यात भरत असेल, तेव्हा खालच्या भागात आणि ब्रह्मपुत्रेमध्ये फारच कमी किंवा अजिबातच प्रवाह नसेल.''

ठक्कर म्हणाले की, धरणाच्या पाण्याच्या प्रवाहात अचानक बदल झाल्यामुळे प्रवाहाच्या खालच्या भागात अधिक गंभीर आणि तीव्र पूर येण्याची शक्यता आहे. धरणामुळे प्रवाहाच्या खालच्या दिशेने वाहणारे गाळ आणि पोषक घटक देखील कमी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे गाळमुक्त किंवा धरणाच्या सोडलेल्या पाण्यामुळे (हंग्री वॉटर) नदीच्या पात्रात धूप वाढेल. या प्रकल्पामुळे जैवविविधता, विशेषत: मासे आणि इतर जीवजंतूंचा अपस्ट्रीम–टू–डाउनस्ट्रीम प्रवाह मर्यादित होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

''चिनी धरणाशिवायही हे सर्व घडेल.''

(सौजन्य: द स्क्रोल)

अनुवाद: सिरत सातपुते

satputesirat@gmail.com

(संपादकीय: पान ४ वरुन)

हे प्रचलित होणे आवश्यक आहे. संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे शेवटचे भाषण केले होते, त्यात दिलेला इशारा लक्षात ठेवूया! संविधान कितीही चांगले असो, ते राबवणारे सत्ताधारी जर कुचकामी निघाले तर ते संविधानालाही कुचकामी बनवू शकतात. इथे तर सत्ताधारी कुचकामी नव्हे तर लबाड नीतीचे असून संविधानच कुचकामी करण्याच्या पाठी आहेत. अशा सत्ताधाऱ्यांवर वर वर्णन केलेल्या, स्वत: संवैधानिक मूल्ये जोपासणार्या सुजाण जनतेचा लगाम हवा! तोच 'प्रजासत्ताका'चा खरा आशय आहे!! आपल्या लोकशाहीचा तोच प्राण आहे!

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

नियमितपणे वर्गणी भरा!

जनतेच्या हिताच्या चळवळीस हातभार लावा!!

वर्गणी ऑनलाईन भरण्याची सोय!

वर्गणी पाठवण्याचे तपशील पान २ वर पहा!!!

वर्गणी संदर्भात चौकशीसाठी आणि वर्गणी

G-Payने भरण्यासाठी संपर्क:

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

९८६९९८४८०३

टिप्पणी

बुलडोझर राज: पत्रकाराचे घर बेकायदेशीररित्या पाडले

स्क्रोल प्रतिनिधी

द वायरने दिलेल्या वृत्तांतानुसार उत्तर प्रदेश पोलिसांनी टिब्रेवाल या पत्रकाराचे घर बेकायदेशीरपणे पाडल्याप्रकरणी माजी जिल्हा दंडाधिकारी आणि अनेक पोलिस अधिकाऱ्यांसह २६ जणांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

६ नोव्हेंबर रोजी, सर्वोच्च न्यायालयाने हे घर बेकायदेशीरपणे पाडले गेले होते हे मान्य केले होते आणि राज्य सरकारला या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या ६ नोव्हेंबर रोजीच्या आदेशानुसार राज्य सरकारला पत्रकार मनोज टिब्रेवाल यांना २५ लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश देण्यात आले होते. नुकसान भरपाईचे आदेश देण्यासोबतच न्यायालयाने उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना या प्रकरणी एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले. राज्याच्या गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभागाला या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. नुकसानभरपाईच्या आदेशानंतर दोन महिन्याच्या आतच हे निर्देश देण्यात आले आहेत.

द वायरच्या वृत्तानुसार पत्रकाराने ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराजगंज जिल्ह्यातील मोहल्ला हमीद नगर येथील त्यांचे घर कथित बेकायदेशीरपणे पाडल्याबद्दल न्यायालयाला लिहिले. त्यानंतर, न्यायालयाने ही तक्रार स्वत:हून रिट याचिका म्हणून नोंदवली.

आकाश यांनी न्यायालयाला सांगितले की, अधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस न देता सप्टेंबर २०१९ मध्ये जिल्ह्यातील रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी घर पाडण्यात आले. त्यांनी आरोप केला की 'रस्त्याच्या बांधकामात गैरप्रकार झाल्याचा आरोप असलेल्या वृत्तपत्रातील अहवालाचा' बदला म्हणून त्यांचे घर पाडण्यात आले. आपल्या निकालात, न्यायालयाने सांगितले की, त्यांच्या तक्रारीची पार्श्वभूमी समजल्याशिवाय, या आरोपात गुंतण्याची गरज नाही. कोर्टाने असेही म्हटले आहे की कायद्याच्या नियमांतर्गत बुलडोझर 'न्याय' अस्वीकार्य आहे आणि सरकारने कथित बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्यापूर्वी योग्य प्रक्रियांचे पालन केले पाहिजे. पोलिसांनी भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी अमर नाथ उपाध्याय, जे मालमत्ता पाडली तेव्हा महाराजगंज येथील जिल्हा दंडाधिकारी होते आणि इतर २५ जणांविरुद्ध गुन्हेगारी कट रचणे, कायद्याचे उल्लंघन करणे आणि बनावट कागदपत्रे तयार करणे यासह इतर आरोपांबद्दल एफआयआर दाखल केला. हा एफआयआर आकाशने मार्च २०२० मध्ये राज्याच्या पोलिस महासंचालकांकडे सादर केलेल्या तक्रारीवर आधारित आहे.

द वायर नुसार या तक्रारीत टिब्रेवाल यांनी दावा केला आहे की, उपाध्याय यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांनी 'मोठ्या कटाचा' भाग म्हणून त्यांचे घर पाडले होते. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी दडपशाही आणि द्वेषपूर्ण वृत्तीने आणि गुन्हेगारी हेतूने मालमत्ता पाडली.

द वायरने नोंदवले की पत्रकाराने असा दावा केला की त्यांचे वडील सुशील कुमार यांनी १८५ कोटी रुपये खर्चून केलेल्या राष्ट्रीय महामार्ग ७३० च्या २१ किमी लांबीच्या बांधकामातील कथित अनियमिततेच्या चौकशीची मागणी करणारी तक्रार लिहिली. त्यानंतर कुमार यांच्या तक्रारीबाबत अनेक वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या. परिणामस्वरुपी, उपाध्याय आणि त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबाविरुद्ध द्वेष बाळगला. आणि काही दिवसांनी ही कारवाई करण्यात आली असे तक्रारीत म्हटले आहे.

आकाशने तक्रारीत नमूद केले आहे की हे घर त्याचे आजोबा पीतराम टिब्रेवाल यांनी १९६० मध्ये नोंदणीकृत कराराद्वारे खरेदी केले होते आणि त्याचे कुटुंब ४५ वर्षांपासून सदर घरात राहत होते.

या तक्रारीत असेही जोडण्यात आले आहे की, घर पाडण्याच्या एक दिवस आधी जिल्हा दंडाधिकारी आणि इतर अनेक अधिकाऱ्यांसमवेत प्रकल्पाबाबत बैठकीसाठी आकाशला, त्याचे वडील आणि भावासोबत बोलावण्यात आले होते. द वायर नुसार आकाशने सांगितले की, खासगी जमिनीवरील बांधकामे पाडली जाणार नाहीत आणि महसूल नकाशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असलेल्या रस्त्याच्या रुंदीनुसारच काम पुढे जाईल, असे त्याच्या कुटुंबीयांना बैठकीदरम्यान सांगण्यात आले होते.

(पान २२ वर)

टिप्पणी

२०१९ नंतर जम्मू-काश्मीरची भरभराट झाली?

सफवत झारगर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच काश्मीर मधील धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाच्या अश्या सोनमर्ग बोगद्याचं उद्घाटन केलं. काश्मीर मधल्या गंडेरबाल जिल्ह्यात श्रीनगर – लेह राष्ट्रीय महामार्गावर बांधलेल्या या ६.४ किमी बोगद्यामुळे लडाख सारख्या हिमाच्छादित पर्वतात असलेल्या दुर्गम भागाशी वर्षभर जोडून रहाणे शक्य होणार आहे. या २०२५ सालातील पहिल्या २ आठवड्यात मोदींनी उद्घाटन केलेला हा दुसरा महत्त्वाचा पायाभूत सुविधेचा प्रकल्प आहे. त्या वेळी बोलताना २०१९ साली त्यांच्या सरकाराने जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा आणि राज्य दर्जा रद्द केल्याचा थेट उल्लेख न करता ते म्हणाले की या केंद्रशासित प्रदेशाने पूर्वीचे कठीण दिवस मागे सारून आपली ‘पृथ्वीतलावरील स्वर्ग’ ही प्रतिमा परत हासील केली आहे. गंडेरबाल येथे जमलेल्या लोकांसमोर ते पुढे म्हणाले, ”जम्मू आणि काश्मीरचे स्थान भारताच्या मुकुटाचे आहे आणि मला हा मुकुट अजून समृद्ध आणि सुंदर करायचा आहे.”

खरं तर जम्मू आणि काश्मीरच्या अर्थकारण आणि इतर विकासा संबंधित निर्देशांकावर नजर टाकली तर या राज्याने पूर्वी देशातील बहुतेक राज्यांपेक्षा चांगलं काम केलं आहे. आणि जेव्हापासून भारतीय जनता पक्षाने या राज्याच्या घटनात्मक वैशिष्ट्यामध्ये बदल आणला आहे तेव्हापासून इथल्या समृद्धीला ओहोटी लागली आहे.

२०१९ पूर्वीचे सामाजिक आणि आर्थिक निर्देशांक

जम्मू काश्मीरच्या कमी लोकसंख्येमुळे त्या राज्याचा भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनातला (GDP) वाटा फक्त ०.८ टक्के इतका आहे. तरीही या राज्याचे मानवी आणि सामाजिक विकासाचे निर्देशांक नेहमीच देशाच्या इतर राज्यांपेक्षा वरचढ राहिले आहेत. गरिबी बद्दल बघायचं तर नॅशनल सँपल सर्व्हे ऑर्गनायजेशनच्या अहवालानुसार जेव्हा २०११-१२ मध्ये भारतात गरिबी रेषेच्या खाली लोकांची संख्या २२ टक्के होती तेव्हा जम्मू आणि काश्मीर मध्ये ती त्याच्या निम्म्याहून कमी म्हणजे फक्त १०.३ टक्के होती. मानवी विकास निर्देशांकात, सरासरी आयुर्मानामध्ये, स्त्री आणि पुरुष दोन्ही, जम्मू आणि काश्मीर नेहमीच देशाच्या सरासरीपेक्षा वरच राहिला आहे. या राज्यातील स्त्री पुरुष प्रमाण हे २०१९ साली झालेल्या नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे –५ नुसार, १००० पुरुषांमागे ९७६ स्त्रिया, हे देशाच्या १०० पुरुषांच्या मागे ९२९ स्त्रिया या प्रमाणापेक्षा खूपच चांगलं आहे. ५ वर्षाखालील बालकांच्या मृत्यूचे प्रमाण या राज्यात १००० जन्मलेल्या बालकांत १८.५ मृत्यू हे देशाच्या १००० बालकांमध्ये ४२ मृत्यू या पेक्षा खूप कमी आहे.

गगनाला भिडलेली बेरोजगारी

आपल्या भाषणात मोदी म्हणाले की सरकारने सुरु केलेल्या पायाभूत प्रकल्पांमुळे जम्मू काश्मीरच्या तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत, पण अधिकृत डेटा सांगतो की २०१९ साली जेव्हा जम्मू आणि काश्मीरचा राज्याचा दर्जा काढून त्याला केंद्रशासित प्रदेशात रुपांतर केलं, तेव्हापासून बेरोजगारी वाढलेली आहे. या नोव्हेंबर मध्ये पिरियोडिक लेबर फोर्स सर्व्हेचा २०२४ जुलै ते सप्टेंबर या तिमाहीचा अहवाल बाहेर आला, त्यात जम्मू काश्मीरचा बेरोजगारी दर वाढून ११.८ टक्के झाला जो गेल्या वर्षी याच तिमाही मध्ये १०.२ टक्के होता. १५ ते २९ या वयोगटातील तरुणांमधला बेरोजगारी दर जम्मू काश्मीरचा ३२ टक्के आहे जो राष्ट्रीय सरासरी दर १५.९ टक्के पेक्षा खूपच जास्त आहे. गेल्या काही वर्षांच्या पिरियोडिक लेबर फोर्स सर्व्हेचा अभ्यास केल्यावर दिसून आलं की २०१७ ते २०१९ मध्ये जम्मू काश्मीर राज्याचा बेरोजगारी दर नेहमीच राष्ट्रीय सरासरी दरापेक्षा कमी राहिला होता. पण जुलै २०१९ पासून, जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा काढून टाकायच्या एक महिना आधी ते जून २०२४ पर्यंत जम्मू काश्मीरचा बेरोजगारी दर सतत राष्ट्रीय सरासरी दरापेक्षा जास्त राहिला आहे. कोविड १९ च्या महासाथीच्या परिणाम संपूर्ण जगावर झाला. या दरम्यान जेव्हा आपल्या देशाचा बेरोजगारी दर ४.८ टक्क्यावरून ३.२ टक्क्या पर्यंत खाली आला, तेव्हा जम्मू काश्मीर मधील बेरोजगारी दर फक्त ६.७

(पान २८ वर)

टिप्पणी

मि. प्रेसिडेंटपेक्षा मरियन बडी

प्रदीप आवटे

दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतली. आणि त्यानंतर नॅशनल प्रेयर सर्विस निमित्ताने बोलताना वॉशिंग्टन शहराच्या पहिल्या महिला बिशप मरियन बडी यांनी आपले विचार व्यक्त केले. नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षासमोर बोलताना साठी ओलांडलेल्या मरियन बडी यांनी जे धाडस दाखवले आहे ते खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. त्यांचे हे छोटेसे भाषण नीट ऐकले तर ते ऐकता ऐकता १८९३ साली शिकागोच्या धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी केलेल्या भाषणाचे सूर आपल्या कानावर पडू लागतात, इतके हे भाषण महत्त्वाचे आहे. मानवी जगण्यातील धर्मासह साऱ्या संकल्पनाच आपला अर्थ हरवून बसलेल्या असताना धर्म या संकल्पनेची नेटकी व्याख्या देखील मरियन बडी यांनी यानिमित्ताने पुन्हा एकदा आपल्यासमोर ठेवली आहे.

मरियन बडी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना उद्देशून, त्यांच्याकडे पाहत अत्यंत नम्रपणे त्यांना सांगतात,

“मला तुम्हाला एक शेवटची विनंती करायची आहे. मिस्टर प्रेसिडेंट, लाखो लोकांनी तुमच्यावर विश्वास दाखवलाय आणि जसं तुम्ही काल अवघ्या देशाला सांगितलं, त्या प्रेमळ परमेश्वराचा सर्वशक्तिमान हात तुमच्यासोबत आहे.

त्या आपल्या परमेश्वराची आठवण ठेवत मी आपल्याला सांगू इच्छिते की, आपल्या देशातील अनेक लोक खूप घाबरलेले आहेत त्यांच्याशी तुम्ही दयार्द बुद्धीने वागावे.

गे, लेसबियन आणि ट्रांसजेंडर मुलं प्रत्येक कुटुंबात आहेत, मग ती कुटुंब डेमोक्रॅटिक असतील,रिपब्लिकन असतील की स्वतंत्र विचारांची ! ही सगळीच त्यांच्या जीवाच्या भीतीने घाबरून गेली आहेत.”

“...आणि ते लोक जे आपली पिकं काढायला मदत करतात, आपल्या ऑफिसची स्वच्छता करतात, आपल्या पोल्ट्री फार्ममध्ये, आपल्या मिटपॅकिंग प्लांट्स मध्ये काम करतात, आपण हॉटेलमध्ये जेवल्यावर आपली ताटं विसळतात, आपल्या हॉस्पिटलमध्ये रात्रपाळी करतात, कदाचित ते आपल्या देशाचे नागरिक नसतील किंवा त्यांच्याकडे पुरेशी कागदपत्रे नसतील पण या स्थलांतरित लोकांपैकी बहुसंख्य लोक हे गुन्हेगार नाहीत. ते टॅक्स भरतात, ते आपले चांगले शेजारी आहेत. ते आपल्या चर्च, मशिदी, सिनेगॉग, गुरुद्वारा आणि मंदिरांचे विश्वासू सदस्य आहेत.”

“मिस्टर प्रेसिडेंट, आपला समाजातील ज्या मुलांना आपले पालक आपल्यापासून हिरावून घेतले जातील अशी भीती वाटते त्या सगळ्यांसाठी मी दयेची याचना करते आणि युद्धजन्य भागातून, प्रचंड छळाला त्रासून जे लोक आपापले देश सोडून इथं आसऱ्यासाठी आले आहेत त्यांना सहानुभूतीने आणि प्रेमाने वागवलं जावे अशी विनंती करते.”

“आपला परमेश्वर आपल्याला शिकवतो की, अनोळखी माणसांसोबत दयेने वागा आणि आपण विसरता कामा नये की आपणही कधीकाळी या देशामध्ये अनोळखीच होतो.”

“तो सर्वशक्तिमान आभाळीचा बाप प्रत्येक माणसाला प्रतिष्ठेने वागवण्यासाठी आवश्यक अशी ताकद आणि धाडस आपल्याला देवो, एकमेकांशी प्रेमाने सत्य बोलण्याची क्षमता देवो आणि आपण सर्वांनी एकमेकांसोबत आणि आपल्या परमेश्वरासोबत ही वाट चालताना या देशातील आणि जगातील सर्व लोकांच्या भल्याचाच विचार आपल्या मनात असो !”

या भाषणात काय नाही? ज्ञानदेवाचे अवघे पसायदान इंग्रजी भाषेत अनुवादित केले तर ते याच्याहून वेगळे काय असेल ? ‘दया क्षमा शांती तेथे देवाची वस्ती’ या तुकोबाच्या अभंगाचा आशय याहून वेगळा कसा असेल? धर्म समाजाची धारणा करतो आणि म्हणून समाजातील प्रत्येक माणसाची काळजी त्यानं आपुलकीने आणि जिव्हाळ्यानं घेतली पाहिजे आणि जर सत्तेच्या सर्वोच्च पदावर बसणारे लोक माणसांमध्ये भेदभाव करत असतील तर ‘भेदभाव धर्म अमंगळ’ हे उच्च रवाने ठणकावून सांगण्याचे धाडस देखील खऱ्या धार्मिक व्यक्तीत असले पाहिजे. कारण खरी धार्मिक व्यक्ती ही भित्री आणि सत्तेपुढे नमणारी नसते तर वेळप्रसंगी सत्तेला देखील दोन शब्द सुनावण्याचे नैतिक धैर्य तिच्या अंगी असते. ‘अंकल टॉम्स केबिन ‘ लिहिणाऱ्या हॅरियट बीचर स्टोवेबद्दल बोलताना,’ अमेरिकन यादवी युध्दाला कारणीभूत

ठरलेली एक एवढीशी स्त्री ' असे उद्गार अब्राहम लिंकन यांनी काढले होते. परवाच्या भाषणानंतर आणखी एक एवढीशी मरियन प्रेसिडेंट पेक्षा बडी वाटली, हे मात्र खरेच !

अर्थात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना हे सारं प्रवचन अत्यंत बोअरिंग आणि त्रासदायक वाटलं. मेरीयन बडी यांनी देशाची बिनशर्त माफी मागितली पाहिजे असे ट्रम्प यांनी याबद्दल म्हटले आहे. रिपब्लिकन पक्षाच्या एका खासदारांनी तर देशाबाहेर पाठवण्याची व्यक्तींची जी यादी आपण तयार करतो आहोत त्यात या बिशप बाईंचे नाव पहिले असले पाहिजे, असेही म्हटलं.

दया, क्षमा,शांती आणि प्रेमाचा मार्ग दाखवणाऱ्या माणसांचं बोलणं कंटाळवाणे आणि बोअरिंग वाटावं, त्रासदायक वाटावं, असाच हा सारा काळ आहे. धर्माच्या नावावर मॉब लिंचींग, आगी लावणे, दंगली भडकावणे हे जिथे समाजसंमत होत चालले आहे तिथे दया क्षमा शांती आणि प्रेमाची गोष्ट करणारी माणसं वेडपटच ठरणार आहेत. त्यांना प्रत्येक देशाबाहेर हाकलण्याची मागणी होत राहणार, कदाचित त्यांचा कोणताच देश नाही.

आणि तरीही ' वैष्णव जन तो तेने कहीये, जो पीर पराई जाने रे,' असे सांगणारे आमच्या गुजरातचे नरसी मेहता अजून कालबाह्य झालेले नाहीत, याची खूण परवा या मरियन बाईंना ऐकताना झाली आणि मन विलक्षण आनंदाने ओसंडून वाहू लागले.

मनात आले,

"स्वत: भोवती फिरत राहिलेल्या
पृथ्वीचा अक्ष पदर,
अजूनही
पुरता ढळलेला नाही,
अजूनही ध्रुवीय प्रदेशातील
सगळेच बर्फ वितळलेले नाही.
अजूनही तरेल हे जग...
नक्कीच !"

dr.pradip.awate@gmail.com

(विशेष: पान ७ वरुन)

झालेल्या असल्यानं, भिंती उमेदवारांच्या नावांनी आणि घोषणा आश्वासनांनी रंगल्यायत. गावात शेतकऱ्यांना मोफत वाटण्यासाठी, चार हजार पोती युरिया खत येऊन पडलं आहे. पाण्यानं भरलेला टँकर (तो टँकर हवेली तालुक्यातून भरून आलेला आहे.) रस्त्यानं चाललाय, त्याच्या पाठोपाठ युरिया खताच्या गोणी रचलेली गाडी. हे खत कुणासाठी? कशासाठी?

पुण्याच्या 'एक्वडॅम (ACWADAM)' संस्थेनं 'पाणी पंचायती' वर एक अहवाल नुकताच तयार केला आहे. १९९८ ते २००२ या दुष्काळी कालखंडातील पाहणीवर हा अहवाल आधारलेला असल्यानं त्याला विशेष महत्त्व आहे. भूजल व्यवस्था ही एक सामाजिक साधनसंपत्ती आहे. (CPR: Common Property Resources), तिच्या नैसर्गिक मर्यादा लक्षात घेऊन भूजल नियोजनाचं आधुनिक भारतातील पहिलं वहिलं उदाहरण म्हणजे 'पाणी पंचायत', असं या अहवालात म्हटलं आहे. 'पाणी पंचायती'ची व्यवस्था हे भूजल–मागणी–व्यवस्थापनाचं एक उत्कृष्ट उदाहरण आहे. 'पाणी पंचायती'ची नियोजनपद्धती व व्यवस्थापन सी. पी. आर. चे जवळजवळ सर्व निष्कर्ष पार पाडतात. या योजनांचा आजवर अभ्यास झालाय, तो फक्त ही संकल्पना काय आहे व बऱ्याच उदाहरणांपैकी एक या दृष्टिकोनातून. खरं तर आता, ' पाणी पंचायती'च्या व्यवस्थेची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी कशी होईल, त्या दृष्टिकोनातून प्रयत्न व्हायला हवेत, असंही या अहवालात नमूद केलं आहे.

या पार्श्वभूमीवर 'ग्रामगौरव प्रतिष्ठान'चं कार्य ज्या पद्धतीनं आजही चालू आहे, त्याची नोंद इथं केल्याशिवाय राहावत नाही. प्रतिष्ठानचा सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या सहकार्यानं पुरंदर जिल्ह्याच्या पूर्वभागातल्या दहा गावांचा जमीन - पाणी - उत्पादन साधनं यांच्यासंबंधात अभ्यास चालू आहे. गाव हेच एकक धरून पोंढे, माळशिरस या गावांत पाणी अडवण्या–जिरवण्याचे उपक्रम प्रतिष्ठान राबवत आहे. आदिवासी विकास प्रकल्पासाठी असलेल्या केंद्रीय अर्थसाहाय्याच्या आधारे प्रतिष्ठाननं जुन्नर, आंबेगाव, खेड (राजगुरुनगर) या भागात आदिवासींसाठी जवळपास ३० लघु उपसा जलसिंचन योजना हाती घेतल्या आहेत, त्या पूर्णतेच्या मार्गावर आहेत. विलासरावांनी सुरू केलेली 'पाणी पंचायत' पत्रिका प्रतिष्ठान आता 'पाणी पत्रिका' नावानं प्रकाशित करते. सेंद्रिय शेती, ग्रामविकास यावर पत्रिकेचा भर असतो.

विलासरावांच्या संदर्भात तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांची ऑगस्ट २००४ मध्ये मी मुलाखत घेतली. त्यावेळी त्यांनी विलासरावांसंबंधी काढलेले उद्गार इथं नोंदवण्याचा मोह होतो. "पाण्याच्या थेंबाशी इमान असणारा हा माणूस पाण्याच्या थेंबासारखाच नितळ होता. विलासराव म्हणत, ते आज नाही, तरी नजीकच्या भविष्यात तुम्हांला स्वीकारावंच लागेल. पाणी मोजूनच द्यावं लागेल !" पाणी प्रश्न हा आपला राष्ट्रीय प्रश्न आहे. तो प्रत्येकाला समजून घ्यावाच लागेल आणि सत्य स्वीकारावंच लागेल. ते सत्य म्हणजे 'प्रत्येकाला पाण्याचा हक्क आहे आणि पाणी मोजूनच मिळेल.'

veenagavankar@gmail.com

टिप्पणी

जपानच्या अणू बॉम्ब स्फोटातून वाचलेल्यांच्या संघटनेला नोबेल पुरस्कार

डॉ. सुहास कोल्हेकर

आज संपूर्ण मानवतेलाच अणूयुध्दाच्या मोठ्या धोक्याला सामोरे जावे लागते आहे. याची सुरवात १९६२ सालच्या क्यूबन मिसाईल संकटाने झाली. अशा वेळी २०२४ चा जागतिक शांतता पुरस्कार (नोबेल पीस प्राईझ) **निहान हिडानक्यों** संघटनेला देण्यांत आल्यामुळे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले गेले आहे, ते अणूशस्त्र नाहीसे करण्याच्या शहाणपणाच्या राजनीतिक कौशल्याकडे. **निहान हिडानक्यों** या अणु स्फोटातून जबर जखमी होऊनही वाचलेल्या पण शारीरिक व्यंग, वेदना आणि अपंगत्व कायमचं सहन करणाऱ्या 'हिबाकुशा' लोकांच्या संस्थेची स्थापना १० ऑगस्ट १९५६ रोजी अणू बॉम्ब विरोधातील दुसऱ्या जागतिक परिषदेत झाली. याला अमेरिकेने केलेल्या यु. एस. ब्रव्हो एच बॉम्ब टेस्ट ची पाश्वभूमी होती. कारण हा "हायड्रोजन बॉम्ब'' हिरोशिमा व नागासाकी वर डागण्यांत आलेल्या अणूबॉम्बच्या हजार पट अधिक शक्तीशाली होता. तेंव्हापासून निहान हिडानक्यों पुढील दोन प्रमुख मागण्या लावून धरत आहे. एक, अणूयुध्द होऊच देऊ नका, ती थोपवा व अणूशस्त्र नष्ट करा आणि दोन, अणू बॉम्ब पिडितांना सर्व आवश्यक वैद्यकीय उपचार व सेवा पुरवल्या जातील याची निश्चिती करा.

ओस्लो, नॉर्वे येथे निहान हिडानक्यों यांना नोबेल पारितोषिक प्रदान करण्यांत आले त्या कार्यक्रमांत भाषण देतांना जोसेफ गिरसन यांनी या प्रसंगाच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून निमंत्रित करुन सन्मान केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले की, अमेरिकेतील शांती चळवळीचे प्रतिनिधी म्हणून धैर्यवान हिबाकुशा व अन्य समर्पित कार्यकर्ते यांच्या समर्थनार्थ माझाही आवाज मिसळवत त्यांनी दिलेल्या मोठ्या धोक्याच्या सूचनेकडे मी लक्ष वेधतो. ती सूचना म्हणजे, मानवी समूह आणि अणूशस्त्र सोबत राहूं शकत नाहीत. सन १९४५ साली हिरोशिमा मधील विनाश आणि वेदना बघितलेला पहिला पत्रकार विलफ्रेड ब्रुचेट. त्याने नंतर असे रिपोर्ट केले की, अत्यंत वेदनादायक शारीरीक व मानसिक स्थिती असून देखील हिबाकुशा हे अणूशस्त्र नष्ट करण्यासाठी जगातील सर्वाधिक समर्थ आणि परिणामकारक ताकद बनले. नोबल शांती पुरस्कार मिळाल्यामुळे आता हिबाकुशा, त्यांच्या वेदनादायक मुलाखती आणि त्यांची अणूशस्त्रमुक्त जग करा, या साठीची कळकळीची विनवणी आता जगभर अधिक जोमाने निनादत राहील. हिडानक्यो चे कार्यवाह म्हणून २० वर्ष कार्यभार सांभाळलेल्या टानाका टेरूमी यांनी २५ वर्षांपूर्वी एका संपर्क यात्रेत एक हृदयस्पर्शी प्रश्न विचारला होता. आम्ही हिबाकुशा मेल्यानंतर कोण आमची आठवण काढेल? आता आपण सर्व जाणतो की, नोबेल पुरस्कार देण्यांत आल्यामुळे सर्व जगालाच त्याची आठवण राहील! प्रश्न असा आहे की, मानवजात आता तरी हिबाकुशांच्या निवेदनानुसार सावध होणार का? मानवजातीच्या अस्तित्वास निर्माण झालेल्या धोक्याची सूचना देणा-या निहोन हिडानक्यो आणि त्याचे हिबाकुशा सदस्य यांचे खरे आभार मानायचे तर आपण सर्वांनी आग्रह धरायला हवा.... आता कधीच हिरोशिमा – नागासाकी सारखे हल्ले नकोत, आता आणखीन हिबाकुशा नकोत, आता युध्दच नकोत!

kolhekar.suhas@gmail.com

(टिप्पणी : पान १८ वरुन)

अधिकाऱ्यांनी आकाशला योजनेच्या पाच फूट त्रिज्येच्या आत येणाऱ्या मालमत्तेचा काही भाग पाडण्याचे निर्देश दिले, असे तक्रारीत म्हटले आहे. पत्रकाराने असा दावा केला की बैठकीनंतर हा भाग त्याने रातोरात पाडला. मात्र, अधिकाऱ्यांनी दुसऱ्याच दिवशी संपूर्ण घर पाडले, असेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

भारतीय कायद्यात अशा कोणत्याही तरतुदी नाहीत ज्यामुळे दंडात्मक उपाय म्हणून मालमत्तेची नासधूस करता येईल. असे असले तरी, प्रामुख्याने भारतीय जनता पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये ही प्रथा सर्रास सुरू झाली आहे.

(सौजन्य: Scroll.in)

अनुवाद: सिरत सातपुते

satputesirat@gmail.com

टिप्पणी

शिक्षण संस्थातील जातिभेदात रुजत आहेत विद्वेषाची मुळे

मीनल उत्तुरकर

भारताने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्म निरपेक्षता या तत्वांना कायदेशीर अधिकारात प्रमाणित करणाऱ्या संविधानाला स्वीकारून या वर्षी ७५ वर्ष पूर्ण झाली, तरीही देशात शाळा, कॉलेज सारख्या शिक्षण क्षेत्रात आणि इतरत्रही जात, धर्म यांच्यावर आधारित भेदभाव काही नष्ट होण्याचं नाव घेत नाही. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच समाजातील भेदभाव नष्ट होऊन समता व बंधुता नांदावी या साठी समाज सुधारणेची चळवळही जोरात सुरू होती. त्याचीच परिणती सर्वसमावेशकत्वाची तत्वे अंगिकारलेल्या संविधानाच्या निर्मितीत झाली. तरीही भेदभावाची कीड आजही समाजाला पोखरत आहे. संपूर्ण देशात कुठे ना कुठे तरी जाती वरून, धर्मा वरून अन्याय होण्याच्या घटना घडतच आहेत. आणि आता तर हिंदुत्वाच्या नावाखाली उच्च नीच ठरवणाऱ्या वृत्तींना सुप्तपणे पाठींबा देणाऱ्यांच्या हातात सत्तेच्या दोऱ्या आहेत याची खात्री असल्याने उन्मत्तपणे असे अन्याय होण्याच्या गोष्टींना उधाण आले आहे.

इंडियन इन्स्टिटूट ऑफ मॅनेजमेंट या सारख्या व्यावसायिक उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये सुद्धा त्यांच्या उच्च शिक्षित प्राध्यापकांना जातिभेदाचा सामना करावा लागत असेल तर गावागावातल्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये काय परिस्थिती झाली आहे याची कल्पना काही घटना घडत आहेत त्यावरून करू शकतो. माध्यमातून बाहेर येणाऱ्या घटना या हिमनगाच्या टोकासारख्या आहेत; कारण वास्तवात घडलेल्या घटनांमधून फार कमी घटना आपल्यापर्यंत पोहचतात.

बंगळूरू यथे असलेल्या इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या प्रख्यात संस्थेमध्ये त्यांचे एक असोसिएट प्रोफेसर डॉ. दास, जे अनुसूचित जातीचे आहेत त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्याकडे तक्रार केली की त्यांना या संस्थेत जातीवरून भेदाचा अनुभव येत आहे. राष्ट्रपतींनी नगरी हक्क संचालनालयाला या प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिले. संचालनालयाने चौकशी करून कर्नाटक राज्याच्या सामाजिक कल्याण खात्याकडे अहवाल पाठवला. त्यात लिहिलं की संस्थेचे डायरेक्टर डॉ. ऋषिकेश कृष्णन यानी सर्वांना पाठवलेल्या मेल मध्ये डॉ. दास यांच्या जातीचा उल्लेख केला होता. तसंच डॉ. कृष्णन आणि संस्थेचे डीन डॉ. दिनेश कुमार यांनी डॉ. दास यांना सामान संधीचा अधिकार नाकारला आहे. या अहवालात असंही लिहिलं आहे की संस्थेने अनुसूचित जाती आणि जमातीच्या कर्मचाऱ्यांसाठी तक्रार निवारण कक्ष न स्थापून वैधानिक नियमांचा भंग केला आहे. या अहवालाला ग्राह्य मानून कर्नाटक सरकारच्या सामाजिक कल्याण खात्याने बंगळूरू पोलीस आयुक्तांना इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट विरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

ही आहे हल्ली घडलेली घटना, पण अशा प्रकारच्या घटना या पूर्वीही शाळा, कॉलेजेस आणि युनिव्हर्सिटीत घडलेल्या आहेत. विशेषत: गेल्या काही वर्षांपासून त्यांचं प्रमाण वाढलं आहे. राजस्थान मधल्या एका खेडेगावातील प्राथमिक शाळेत दलित मुलाने शिक्षकांच्या माठातलं पाणी प्यायलं म्हणून त्याला इतका मार दिला की त्यात त्याचा मृत्यू झाला. खूप गाजावाजा झाल्यानंतर कारवाई झाली आणि शिक्षकाला अटक झाली. पण शाळेतील निरागस मुलांना त्यांच्या जाती धर्माच्या उच्च नीचतेची जाणीव करुन देणं हे समतेच्या, बंधुतेच्या तत्वा विरुध्द तर आहेच पण बेकायदेशीर सुद्धा आहे. याची माहिती असूनही असे अन्याय्य वर्तन करण्याचे धारिष्ट्य शिक्षणासारख्या पवित्र समजल्या जाणाऱ्या कार्यातील लोकांना होते याचा अर्थ जात पात धर्म लोकांच्या मनात किती खोलवर रुजले आहेत याची कल्पना येते.

व्यावसायिक समजल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांमध्येही दलित समाजातील विद्यार्थ्यांना इतकी मानहानी सहन करावी लागते आणि त्याचा त्यांच्या मनावर इतका खोल परिणाम होतो की त्यांच्यासमोर आत्महत्येशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. २०१६ साली हैदराबाद सेंट्रल यूनिवर्सिटी मधील २६ वर्षाचा एक दलित पीएचडी स्कॉलर रोहित वेमूलाने आपल्या हॉस्टेलच्या

खोलीत गळफास लावून आत्महत्या केली. त्यापूर्वी त्याने लिहिलेल्या पत्रात म्हटले की लहान पणापासून मी जातीभेदाला तोंड देत आलो आहे आणि आता या व्यवस्थेचा त्रास मला सहन होत नाहीये. त्याच्या मृत्यू नंतर देशातील अनेक युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आणि देशभर आंदोलने केली गेली. कोर्टात यूनिवर्सिटी विरुध्द खटले दाखल केले गेले. अशीच एक घटना मुंबईच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मध्ये घडली. तिथे पायल सलीम तडवी ही २६ वर्षाची आदिवासी मुस्लिम भिल या अनुसूचित जमातीची मुलगी रेसिडेन्सी करत पोस्ट ग्रॅजुएट शिकत होती. २०१९ साली तिच्या तीन उच्च वर्णीय सहाध्यायी डॉक्टर तरुणींनी तिच्या जातीवरुन तिला इतका त्रास दिला की सहन न होऊन तिने आत्महत्या केली. आजही उच्च शिक्षण देणाऱ्या व्यावसायिक युनिव्हर्सिटीज मध्ये सुद्धा जातिभेद किती भयानक रुप धारण करत आहे हे जाणून द्यायला या दोन्ही घटना पुरेशा बोलक्या आहेत. या बाबत एक आशेचा किरण दिसत आहे, तो म्हणजे, याच महिन्यात सर्वोच्च न्यायालयात या दोन्ही घटना सुनावणीसाठी आल्या. तेव्हा न्यायमूर्ती सुर्यकांत आणि उज्जल भूयान यांच्या बेंच ने यूनिवर्सिटी ग्रांट कमिशनला आदेश दिला की देशातील युनिव्हर्सिटीज आणि उच्च शिक्षण संस्थांविरुध्द ज्या ज्या जातिभेदाच्या तक्रारी त्यांच्याकडे आल्या आहेत त्या सर्व एकत्र करून ६ आठवड्याच्या आत त्यांच्यासमोर ठेवाव्यात.

आत्ताच बातमी वाचली की पंढरपूर तालुक्यातील गार्डी या गावातील शाळेत रावसाहेब साठे नावाच्या एका दलित शिक्षकांना २३ वर्ष त्या शाळेत शिक्षक म्हणून काम केल्यावर जेष्ठतेच्या निकषानुसार मुख्याध्यापक होण्याची वेळ आली, तेव्हा शाळेच्या संचालकांच्या सुनेने, राणी गायकवाड यांनी, आपल्या शाळेत एक दलित व्यक्ती मुख्याध्यापक पदावर आला तर त्या पदाची आणि शाळेची अब्रू जाईल म्हणून त्यांना पदभार स्वीकारण्यास मनाई केली. साठे यानी शिक्षण विभाग आणि न्यायालयात दाद मागून आपला हक्क मिळवला पण गायकवाड बाईंनी न्यायालयाचा आदेश धुडकावून लावत त्यांना त्या पदावर बसू दिलं नाही. साठे यांनी पोलिसात तक्रार केल्यावर पोलिसांनीही स्थानिक राजकारण्यांच्या सांगण्यावरून बोटचेपी भूमिका स्वीकारली. पंढरपूर सारख्या वारकऱ्यांमार्फत समानतेचा आदर्श घालून देणाऱ्या ठिकाणी आजच्या काळातही अशी भेदाभेद सत्ताधाऱ्यांच्या आशिर्वादाने उजळपणे चालू आहे.

शिक्षण संस्थांमध्ये जशा जातिभेदाच्या घटना घडत आहेत तशाच धर्माच्या नवाखाली भेदाभेद करण्याच्या घटनाही वाढत आहेत. सप्टेंबर मध्ये उत्तर प्रदेशातील अमरोहा या शहरात एका कॉन्वेंट शाळेत ७ वर्षाच्या मुस्लिम विद्यार्थ्यास त्याने डब्यात मांसाहारी पदार्थ आणल्याबद्दल शिक्षा करण्यात आली. त्याला वर्गात बसू न देता कंप्यूटर लॅब मध्ये ५ तास कोंडून ठेवण्यात आलं. त्याच्या आईला शाळेत बोलवून त्याला घरी घेऊन जायला सांगितलं. दुसऱ्या दिवशी आई मुख्याध्यापक अवनीश कुमार शर्मा यांना भेटण्यास गेली तेव्हा तिला त्यांच्या धर्मावरून वाईट शब्द सुनावण्यात आले. तिने त्यावर सांगितले की तिच्या मुलाने सोया बिर्याणी आणली आहे, मांसाहार नाही पण ते ऐकायला तयार नव्हते. त्या शाळेत शिकणाऱ्या तिच्या तिन्ही मुलांना शाळेतून काढून टाकण्यात आले. पुढच्या आठवड्यात त्या मुलांची आई, सबरा हिने शाळेविरूद्ध आणि मुख्याध्यापकांविरुद्ध पोलिसात आणि डिस्ट्रिक्ट मजिस्ट्रेट कडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला पण कुणीही तक्रार नोंदवून घेतली नाही. शेवटी तिने अलाहाबाद हायकोर्टाचे दार ठोठावले. तिथे मात्र तिची तक्रार ऐकून घेतली गेली आणि कोर्टाने डिस्ट्रिक्ट मजिस्ट्रेटला आदेश दिले की तिच्या तीनही मुलांना पुढच्या २ आठवड्यात दुसऱ्या तशाच शाळेत प्रवेश दिला गेला पाहिजे. तिच्या मुलांना शाळा मिळाली पण अजूनही मुलांना धर्मावरून वाईट वागणूक दिल्याबद्दल त्या शाळेतील मुख्याध्यापक शर्मा यांना शिक्षा झालेली नाही.

शाळा, कॉलेज सारख्या शिक्षण संस्थात जिथे गुरुसमान असणाऱ्या शिक्षकांनी मुलांची कोवळी मने जपून त्यांना समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता या सांविधानिक मूल्यांची जाणीव करुन द्यायला हवी तिथे त्यांच्यात जाती धर्मावरून भेदाभेद करणे हे अतिशय अन्यायकारक आहे. अशा वागणुकींमुळे मुलांच्या मनात विद्वेषाची भावना बळावून समाजात दुही माजण्याची शक्यता वाढेल. अंतिमत: देशाच्या एकात्मतेची वीण विस्कटून देश अशांततेच्या वाटेवर चालायला लागेल, याची भीती वाटते.

meenalutturkar16@gmail.com

टिप्पणी

राज्यातील महायुतीचे ६२ टक्के मंत्री गुन्हेगारी पार्श्वभूमीचे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या मंत्रिमंडळातील ६२ टक्के मंत्री गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असून त्यातील काही मंत्र्यांवर तर खुनाचा प्रयत्न यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

राज्यातील महायुती सरकारचा रविवारी शपथविधी झाल्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यासह ४२ मंत्र्यांचे मंत्रिमंडळ स्थापन झाले. एकीकडे राज्यात स्वच्छ आणि पारदर्शी कारभार करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देत असताना दुसरीकडे मात्र त्यांच्याच मंत्रिमंडळातील ४२ पैकी २६ म्हणजेच ६२ टक्के मंत्र्यांवर विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स्' (एडीआर) आणि 'महाराष्ट्र इलेक्श्नन वॉच' या संस्थांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

राज्य विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जाबरोबर दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे मंत्र्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचे विश्लेषण या अहवालात करण्यात आले आहे. महायुती सरकारमधील १७ म्हणजेच ४० टक्के मंत्र्यांवर खुनाचा प्रयत्न, महिलांशी सबंधित, फसवणूक, खंडणीसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. भाजपच्या २० पैकी १६ म्हणजेच ८० टक्के मंत्र्यांवर विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यातही १० मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत, तर तीन मंत्र्यावर खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे नोंद आहेत. शिवसेनेच्या ५० टक्के म्हणजेच १२ पैकी ६ मंत्र्यांविरोधात गुन्हे दाखल असून तीन मंत्र्यांविरोधात गंभीर गुन्ह्याची नोंद आहे, तर राष्ट्रवादीच्या १० पैकी ४ मंत्र्यावर (४० टक्के) गुन्हे दाखल असून चार मंत्र्यांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत.

महायुतीचे संपूर्ण सरकारच कोट्यधीश असून सर्वात कमी श्रीमंत असलेले शिवसेनेचे मंत्री प्रकाश अबिटकर यांची संपत्ती १.६ कोटी आहे, तर मंत्रिमंडळात सर्वात श्रीमंत मंत्री मंगलप्रभात लोढा असून त्यांची संपत्ती ४४७.०९ कोटी रुपये आहे. लोढा हेच सर्वात मोठे कर्जबाजारी मंत्री असून त्यांच्यावर ३०६.२२ कोटींचे कर्ज आहे. ४२ पैकी १३ (३१ टक्के) मंत्र्यांनी आपले शिक्षण इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण झाल्याचे नमूद केले, तर २५ मंत्र्यांचे शिक्षण पदवी आणि पदव्युत्तरपर्यंत झाले आहे. चार मंत्री डिप्लोमाधारक आहेत. मंत्रिमंडळातील २९ मंत्री ५१ ते ८० वयोगटातील तर १३ मंत्री ५० वर्षांखालील आहेत. मंत्रिमंडळात १० टक्के म्हणजेच ४ महिलांना प्रतिनिधित्व मिळाले आहे.

(दै. लोकसत्ताच्या सौजन्याने)

लोकशाही समाजवादी चळवळ पुन्हा गतिमान करणे आवश्यक!

'लोकशाही समाजवादी चळवळ गतीमान करण्याची गरज' हे सृजन प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी लिहीलेले पुस्तक अधिक अभ्यासकांपर्यंत जावं आणि समजावादावरील चर्चा पुढे जावी या साठी महत्त्वाचं आहे. यात डॉ. संजय यांनी भारतातील लोकशाही समाजवादी विचार व चळवळीच्या इतिहासाचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे. अनेक समाजवादी विचारवंतांचे विचार त्यांच्याच शब्दात उद्धृत केले आहेत. मार्क्सवादी व समाजवादी चळवळींची पिछेहाट आणि उजव्या चळवळींचा वाढता प्रभाव लक्षात घेता समाजवादी विचार आणि व्यवस्थेसाठी नव्याने चर्चा करणे गरजेचे आहे. संजय यांच्या लेखनाच्या निमित्ताने आणि समाजवादाच्या चर्चेच्या निमित्ताने या मुद्यांची चिरफाड झाली तर आवडेल

\- गजानन खातू

हे पुस्तक खालील ठिकाणी उपलब्ध

चिपळूण - राजन इंदुलकर, गडचिरोली - डॉ. सतिश गोगुलवार कणकवली - अर्पिता मुंबरकर, पुणे - भार्गव पवार / प्रा. विनय र र / उपेंद्र टण्णू, नंदुरबार - लतिका राजपूत, रत्नागिरी - अभिजीत हेगशेट्ये, इचलकरंजी - संजय रेंदाळकर, ठाणे - जगदीश खैरालिया

चर्चा

शेतकऱ्यांचा जीव महत्वाचा की हिंस्त्र प्राण्यांचा?

सतीश देशमुख

पिकांवर पडणारा किडीचा प्रादुर्भाव, शेतकऱ्यांना लुटणारे व्यापारी, अन्यायकारक धोरण राबवणारे शासन, वेळी-अवेळी पडणारा पाऊस, बदलते हवामान, घासाघीस करणारे शहरी ग्राहक, दिशाभुल करणारे विचारवंत अशी लांबलचक यादी आहे, ज्यांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात भर आहे वन्यजीव प्राण्यांची.

वन्य प्राणी जसे रानडुक्कर, मोर, तरस, गवा, लांडगे, हत्ती, अस्वल, रोही, काळविट, वानर, वाघ, बिबटे, साप, विंचु, रानकुत्रे, मगर या जनावरांच्या उपद्रवाने शेतकरी खूप त्रस्त झालेला आहे, दहशतीमध्ये वावरत आहे.

आंबेगाव, जुन्नर, शिरुर भागात बिबट्यांच्या हल्ल्यात अनेक शेतकऱ्यांना प्राण गमवावे लागल्याच्या बातम्या दररोज येतात. कोल्हापूर भागात मोर, लांडोर, वानरे पिके फस्त करीत आहेत. मराठवाड्यात रानडुकरे रात्रीत झुंडीत येऊन हातातोंडाशी आलेले पिके उध्वस्त/ सपाट करीत आहेत. चंद्रपूर भागात वाघाची दहशत आहे. कोकणात सिंधुदुर्गनगरी भागामध्ये हत्ती धुमाकूळ घालून पिकांचे, नारळ, केळी, बांबू, भात पिके, फळ झाडांचे नुकसान करीत आहेत. गडचिरोली मध्ये हत्तीच्या आक्रमणाने घरे, झोपड्या उध्वस्त होत आहेत. ओडिशा मध्ये गेल्या दहा वर्षात हत्तीच्या हल्ल्यात 925 जणांचा मृत्यू झाला व 212 जणांना अपंगत्व आले. काही भागात रानडुक्करांचा सुळसुळाट असुन हे कांदा, मका, बटाटा तसेच जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचीही नासधुस करतात. हे कळप एका रात्रीत उभे पीक आडवे करतात, हल्ला करतात. ह्या उपद्रवाचा बंदोबस्त करा अश्या निवेदनाकडे आधिकारी दुर्लक्ष करतात. महाराष्ट्रात गेल्या 4 वर्षात हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यात 348 शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. 2022 साली वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात गाय, म्हैस, शेळी, मेंढी असे 7021 पाळीव प्राणी दगावले आहेत. मालमत्ता, पीक नुकसान व जखमींचा तर हिशेबच नाही.

त्याला कारणीभूत आहे अन्यायकारक ''वन्यजीव संरक्षण अधिनियम'' (Wild Life Protection Act-1972). त्या कायद्यामुळे ह्या प्राण्यांना मारताही येत नाही. कायद्याप्रमाणे (IPL Section 100) आपल्यावर कोणी व्यक्तीने मृत्यूस कारणीभूत ठरू शकणारा हल्ला केल्यास आपण त्या हल्लेखोराला ठार मारू शकतो. पण एखाद्या प्राण्याने हल्ला केल्यास कायद्याचे संरक्षण नाही. हा किती विरोधाभास आहे. मानव-वन्यजीव संघर्षामध्ये प्राणी प्रेमी नेहमी अशी दिशाभूल करतात की प्राण्यांच्या अधिवासात मनुष्याचा हस्तक्षेप वाढला आहे. हे चुकीचे आहे. खरी कारणे वन्य प्राण्यांची वाढती संख्या, जंगलातील त्यांच्या भक्ष्याची कमतरता व आटलेले पाणी स्त्रोत आहेत.

आम्ही जुन्नर भागात दौरा केला तेव्हा असे लक्षात आले की या भागात मनुष्य व बिबट्याने एकमेकांचे सहअस्तित्व नाईलाजाने स्वीकारले आहे. तिथल्या स्थानिकांनी सांगितले की इथे संध्याकाळी सात वाजेपर्यंत माणसाचे राज्य व सातच्या नंतर बिबट्यांचे राज्य असते. काही लोक पारावर गप्पा मारत असताना पलीकडे काही अंतरावर बिबट्या मांजरी सारखा बसलेला दिसतो. एक रात्र आम्ही तिथे मुक्काम करून बिबट्याची दहशत अनुभवली आहे. एका शेतकऱ्याच्या आईला त्याच्या नजरे समोर बिबट्याने पळवुन नेले. त्याच्या दु:ख वेदना ऐकल्या आहेत. नुकसान भरपाई देताना अधिकाऱ्यांनी तीस हजार रुपयाची मागणी केली. उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला, काळवाडी (ता. जुन्नर) आलेल्या 8 वर्षाच्या रुद्र ह्या मुलाला बिबट्याने पळवून ठार मारले. एका ठिकाणी तर आईच्या कुशीत झोपलेले तान्हे बाळ बिबट्याने पळवले.

तिकडे शहरात (हडपसर, पुणे) शिरलेला बिबट्या 15 तासात जेरबंद करतात. व ग्रामीण भागात 3-4 महीने धुमाकूळ/ दहशत निर्माण करणाऱ्या बिबट्यासाठी स्थानिक शेतकरी, आदिवासीना पिंजरा लावा मागणीसाठी आंदोलन करावे लागते. तरी काही कारवाई होत नाही.

शेतकऱ्यांच्या पिकांची खूप नासाडी होत आहे. या जनावरांच्या उपद्रवाने शेतकरी खूप त्रस्त झाला आहे. शेतकऱ्यांना ह्या ज्वलंत पण दुर्लक्षित प्रश्नाचा त्रास होत आहे. पाटण (सातारा) भागात आम्ही दौरा केला तेव्हा सर्वात धक्कादायक माहिती

कळाली की पश्चिम घाटातील 55 गावांचे सर्वेक्षण केल्यावर असे कळाले की 60 % लोक शेती सोडून शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. ह्या प्रश्नाकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष करून शेतकऱ्यांची जमीन प्रकल्पांसाठी बळकावण्याचे गुप्त षडयंत्र आहे. ग्रामस्थांनी सांगितले की पीक नुकसान भरपाई साठी अधिकारी दुसऱ्यांदा पंचनामा करत नाहीत. ग्रामीण भागातील जगणे अत्यंत संघर्षमय झाले आहे.

शेतात धुडगूस घालणाऱ्या रान डुक्करांपासून ते दहशत पसरवणाऱ्या बिबट्यां पर्यंत सर्व वन्य प्राण्यांमुळे शेतकरी भीतीच्या वातावरणात जगतात. शेतकऱ्यांना वावरात मुक्तपणे / निर्भयपणे वावरण्याचे स्वातंत्र्य नाही. हे घटनेने दिलेल्या मूलभूत हक्काचे उल्लंघन आहे.

काही वर्षांपूर्वी यवतमाळमध्ये नरभक्षक 'अवनी' वाघीणीला ठार केल्याबद्दल वन्य प्राणी प्रेमी संघटना अश्रू ढाळत होते. ह्या वाघीणीने ग्रामीण भागातील 13 शेतकऱ्यांची हत्या केली, पशुधनाचा फडशा पाडला त्या वेळी हे लोक कुठे होते? अकरा महीन्यांपासून ह्या परिसरातील ग्रामस्थ दशहतीमध्ये / भितीच्या वातावरणात जगत होते.

आपल्याकडे वन्यप्राणी प्रेमी लोकांच्या खूप संघटना आहेत. 'रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट' च्या संस्थापिका नेहा पंचमिया म्हणतात, "ह्या कडे समस्या म्हणून बघण्यापेक्षा आपल्याला वन्य प्राण्या बरोबर सहअस्तित्व स्वीकारावे लागेल''. हे शहरातील वन्यप्राणी प्रेमी बुद्ध पौर्णिमेच्या चांदण्या रात्री मचाणावर बसून 'निसर्गानुभव' घेऊन प्राणी गणना करणार. वनरक्षक अधिकारी त्या मोहिमेचे नियोजन करण्यात व्यस्त रहाणार. वन्य प्राणी प्रेमी संघटनांनी बिबट्या ग्रस्त भागात राहून, मुक्काम करून दाखवावे. ज्या भागात बिबट्याचा वावर आहे तिथे रात्री उसाच्या शेतात पाणी द्यायला जाऊन दाखवा. शहरातील प्राणीप्रेमी 'विचारवंता'ला एखाद्या बिबट्याने नरडेला धरुन फरफटत ओढत नेऊन नदी किनाऱ्यावर जखमी अवस्थेत सोडल्यानंतर, मग लेख लिहा म्हणावं. शहरामध्ये कुत्रे चावले तरी "भटक्या कुत्र्या मुळे आमच्या जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार धोक्यात आला'' असे म्हणून Advt. सत्या मुळे हे उच्च न्यायालयात याचिका दाखल करतात. आणि ग्रामस्थांनो, तुम्ही अन्याय सहन करायची किती सवय लावून घेतली आहे.

अशी भीषण परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात असताना मंत्री महोदय म्हणतात यावर उपाय म्हणून आम्ही प्रबोधन पर उपक्रम सुरू केले आहेत. मूळ प्रश्नावर उपाययोजना न करता इलेक्ट्रिक फेंन्सींग योजना, समिती नेमली जाईल, कृती दलाची स्थापना, नुकसान भरपाई बद्दल नवीन कायदा अशी दिशाभूल करीत आहेत. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' ह्या संस्थेने मानवी मुखवटे करून चेहऱ्याच्या मागच्या बाजूला लावा म्हणजे संरक्षण होईल असे हास्यास्पद प्रयोग सुरू केले आहेत. दुसऱ्या एका कंपनीने गळ्यात बांधायला काटेरी पट्टे बनवून सादरीकरण केले आहे. वन खात्याने फ्लेक्स लावून नागरिकांनी सतर्क राहून वनविभागाला हल्ला झाल्यास तातडीने माहिती द्यावी, स्वत:चे व प्राण्यांचे रक्षण कसे करावे अशी जनजागृती (?) सुरू केली आहे. शासन सांगते आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मानव – वन्यप्राणी संघर्ष टाळणार; कसे माहीत नाही. बिबट्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी कृत्रिम प्रज्ञा (AI) - मोशन सेन्सर चा वापर करून हल्ले थांबणार आहेत का? "बिबट्या हल्ले मुक्त अभियान'' राबवणार म्हणजे काय? त्यांनी सांगितले की सौर कुंपणाचा प्रयोग पथदर्शी व यशस्वी ठरला आहे. शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयाने स्वत: ला तुरुंगात कोंडून घ्यायचे आहे का? त्यांनी आंबेगव्हाण, जुन्नर येथील प्रायोजित बिबट्या सफारीसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. धक्कादायक म्हणजे एव्हढ्या प्रलंबित व बहू चर्चित सफारी मध्ये फक्त बारा बिबट्यांची सोय होणार आहे. त्या भागातील बिबट्यांची संख्या आहे अंदाजे 500.

आमच्या मागण्या:

1. अमेरिका व इतर 8 देशात जीवन, स्वातंत्र्य मालमत्तेच्या व स्व–संरक्षणासाठी शस्त्रे बाळगण्याचा लोकांसाठी कायदेशीर अधिकार आहे. त्या कायद्या प्रमाणे "Right to Gun" असा कायदा करून शेतकऱ्यांना स्व: रक्षणासाठी हिंस्त्र प्राण्यांना मारण्याची परवानगी देण्यात यावी.
2. वन्यप्राणी व मानव संघर्षाचा अभ्यास करून सुवर्ण मध्य काढुन अन्यायकारक ''वन्य जीव संरक्षण अधिनियम'' (Wild Life Protection Act-1972) ह्या कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.
3. वन जीवन संरक्षण अधिनियम 1972 मध्ये सुधारणा करुन वाघ, बिबटे, लांडगे, कोल्हे, रानडुक्करे, वानरे जे मानवजातीला घातक आहेत व शेतीचे नुकसान करतात त्यांना परिशिष्टच्या यादीतुन (Schedule I, Part I) वगळावे. वरील कायद्यांमध्ये

एक नवीन परिशिष्ट टाकून त्यामध्ये मानवी जीवितहानी पोहोचवणारे, त्यांच्या पशुधन, पिके, मालमत्ता ह्यांची नासाडी करणारे वन्य प्राणी, जे नामशेष होण्याच्या मार्गावर नाहीत, अशांचा समावेश करावा. जेणेकरुन मानवी जीवीतास धोका झाल्यास त्या प्राण्यांची मुक्तपणे शिकार / मृगया करता येईल. ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी सुद्धा वन्य प्राण्यांच्या शिकारीला हवी नियंत्रित परवानगी अशी मागणी केली आहे. शिकारीवर बंदी सारखा कायदा फक्त भारतातच अस्तित्वात आहे.

4. पंचवीस जणांची शूटरची एक टीम तयार करून त्यांच्या मार्फत ज्या ठिकाणी नरभक्षक वन्य प्राणी नागरी वस्तीत येऊन हल्ला करीत आहेत, त्यांची गोळ्या घालून हत्या करण्यात यावी.

5. दक्षिण आफ्रिकेतील नामिबिया तून बारा चित्ते आयात केले होते. त्यापेक्षा महाराष्ट्रातील बिबटे, वाघ बाहेरील देशात निर्यात करावेत.

6. महाराष्ट्र शासनाने किमान 5 नवीन वन्यप्राणी रिसोर्ट ची आर्थिक तरतूद करून तीन वर्षात ते प्रकल्प पूर्ण करावेत. व नागरी वस्तीतील प्रवेश करणाऱ्या वन्य प्राण्यांना पकडून तिकडे नेऊन सोडावे. तोपर्यंत भारतातील इतर राज्यातील अभयारण्य / रिसॉर्ट मध्ये ही हिंस्त्र जनावरे पाठवावीत.

7. कुंपणातील वीज प्रवाहा मुळे काही जनावरे दगावल्यास शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल होतो. ती तरतूद रद्द करण्यात यावी.

8. ग्रामीण भागात दिवसा वीज पुरवठा करावा.

वरील मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी कोणाला ह्या मोहीमे मध्ये सहभागी व्हायचे असल्यास कृपया खालील मोबाईल वर मला टेक्स्ट मेसेज (SMS) करावा.

(लेखक Forum of Intellectuals या संघटनेचे अध्यक्ष आहेत.)

deshmukhsk29@gmail.com

(टिप्पणी: पान १९ वरुन)

टक्क्यावरुन ६.१ टक्क्यावर उतरला. पण येथील १५ ते २९ या वयोगटातील बेरोजगारी दर मात्र पिरियोडिक लेबर फोर्स सर्व्हे नुसार २०२३ २४ मध्ये राष्ट्रीय सरासरी १०.२ टक्के असताना १७.४ टक्के इतका प्रचंड वाढला. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढल्याच्या खुणा जम्मू काश्मीर मध्ये सर्वत्र आढळतात. इथे पोलिस शिपायाच्या नोकरीसाठी परीक्षा जाहीर झाली तेव्हा ४००२ जागांसाठी ५.५ लाख उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली.

वाढते कर्ज, घसरते उत्पादन

प्रश्न फक्त बेरोजगारीचा नाही, तर कर्जबाजारीपणाचा सुद्धा आहे. केंद्र शासित प्रदेशांच्या २०२४–२५ या वर्षाच्या बजेटकडे नजर टाकली तर दिसते की जम्मू – काश्मीरवर एकूण कर्ज आत्ता पर्यंतचे सर्वात जास्त म्हणजे १.१२ लाख करोड आहे, जे २०१९ –२० मध्ये ८३,५७३ करोड होतं. अर्थ शास्त्र तज्ज्ञ या वाढत्या कर्जावर बोट दाखवत काळजी व्यक्त करतात. देशाचा किंवा राज्याचा कर्ज आणि सकल अंतर्गत उत्पादन (जीडीपी) यांचे गुणोत्तर (ratio) कर्ज परत फेडण्याची क्षमता दर्शवतो. जेवढे गुणोत्तर जास्त तेवढे कर्ज फेडण्याची क्षमता कमी. २०२४–२५ च्या बजेट नुसार जम्मू – काश्मीर चे कर्ज आणि जीडीपी चे गुणोत्तर तब्बल ५१ टक्के आहे. हे धक्कादायक आहे. २०११ –१२ मध्ये जम्मू काश्मीर वरचे कर्ज ३६,२५६ करोड एवढे होते. जम्मू काश्मीरचे केंद्रावरचे जास्तीचे अवलंबित्व, खाजगी आणि मोठ्या उद्योगांची कमतरता आणि अनेक दशकांची राजकीय अस्थिरता यामुळे जम्मू काश्मीरला पूर्वीपासूनच कर्जबाजारीपणाची गंभीर समस्या होतीच पण आता ती प्रचंड वाढली आहे.

त्याच प्रमाणे जम्मू काश्मीरचे सकल अंतर्गत उत्पादन २०१५ ते २०१९ या काळात १३.२८ टक्केने वाढले होते. पण २०१९ ला त्याचा राज्याचा दर्जा घालवल्यावर हीच वाढ ८.७३ टक्क्या पर्यंत खाली घसरली आहे. राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या सीमेअंतर्गत होत असलेले वस्तू आणि सेवांचे उत्पादन ज्याला नेट स्टेट डोमेस्टिक प्रोडक्ट (NSDP) म्हणतात त्याचेही प्रमाण जम्मू काश्मीर मध्ये खाली गेले आहे. एप्रिल २०१५ ते मार्च २०१९ या काळात NSDP चा वाढीचा दर १२.३१ टक्के होता तो एप्रिल २०१९ ते मार्च २०२४ या काळात ८.४१ टक्के इतका घसरला आहे. जम्मू काश्मीर सरकारच्या आर्थिक सर्व्हे नुसार इथला महागाई दर सुद्धा सतत वाढता राहिला आहे.

त्यामुळे २०१९ नंतर जम्मू काश्मीरची प्रगती झाली आहे, विकास आणि समृद्धी वाढली आहे हा केंद्र सरकारचा दावा चुकीचा ठरत आहे.

(स्क्रोलच्या सौजन्याने)

अनुवाद: मीनल उत्तुरकर

meenalutturkar16@gmail.com

वृत्तांत

प्रेमाची पखरण करणारा साहित्य कला संवाद

सिरत सातपुते

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र आणि आंतर भारती कलाभवनच्या माध्यमातून साकारलेला साहित्य कला संवाद २०२५ हा साहित्य आणि कला क्षेत्रातल्या कार्यकर्त्या विचारवतांना एकत्र आणणारा कार्यक्रम. यशवंतराव चव्हाण सेंटर आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने ४ आणि ५ जानेवारी २०२५ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे साहित्य–कला संवाद हा कार्यक्रम आयोजित केला गेला. 'विद्वेषाच्या काळात प्रेमाचा उद्गार' या संकल्पनेवर बेतलेला हा साहित्य कला संवाद म्हणजे प्रेमावर विश्वास असणाऱ्यांना बळ देणारा, विद्वेषाचा काळ सुसह्य करणारा! साने गुरुजींचा 'जगाला प्रेम अर्पावे' हा संदेश उजागर करणारा! प्रेमाचा आवाज बुलंद करणारा!

चव्हाण सेंटरच्या दर्शनी भागातील एका कोपऱ्यातील we the people हे राजू सुतार यांनी क्युरेट केलेलं मांडणी शिल्प हे या साहित्य कला संवादातील वैचारिकता स्पष्ट करणारं. या कलाकृतीत संविधानाच्या प्रास्ताविकेच्या जोडीला साने गुरुजींचं भारतीय संस्कृती हे पुस्तक उलगडून ठेवलेलं आणि ज्युटच्या खाटा टांगून ठेवलेल्या. या खाटा कधीही खाली काढून निवांतपणे बसून मोकळ्या चर्चा करण्याचा अवकाश देणारा आपल्या ग्रामिण संस्कृतीचा बाज, ही आपली सामाजिक वीण दर्शविणारा. खुल्या विचारांना मुक्त अवकाश देणारा हा साहित्य कला संवाद आहे हे सूचित करणारा.

अस्मा खान आणि प्रा. अभिजित देशपांडे यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने प्रेममय झालेल्या उद्घाटन सत्राची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. विद्वेषाच्या काळात जगाला प्रेम अर्पावे हा आमचा प्रेमाचा उद्गार आहे हे ठळकपणे सांगणारा फलक उलगडून या साहित्य कला संवादाचे अनोख्या पध्दतीने उद्घाटन करण्यात आले. आणि मग हे विधान कार्यक्रम स्थळी दर्शनी भागात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत या बिरादरीत सर्वांचे स्वागत करीत राहिले. जेष्ठ पत्रकार कुमार केतकर आणि प्रसिध्द सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू झालेला हा साहित्य कला संवाद दोन दिवस प्रेमरसाची बरसात करत राहिला आणि विद्वेषाच्या काळाची दाहकता कमी करत राहिला.

उद्घाटन सत्रात आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राच्या अध्यक्ष प्रसिध्द कवयित्री नीरजा यांनी साहित्य कला संवादाचे प्रास्ताविक केले. कला आणि साहित्यातून प्रेमाचा उद्गार उमटत जावा यासाठी काम करणाऱ्या साने गुरुजी स्मारकाची थोडक्यात ओळख त्यांनी उपस्थितांना करुन दिली. प्रेमाचा धर्म सांगणारी माणसे आज हवी आहेत, आजच्या विद्वेषाच्या कुपोषित दिवसांत प्रेमाचा सकस संदेश घेऊन आम्ही या साहित्य कला संवादाच्या निमित्ताने आलो आहोत असे सांगून प्रेमाचा आवाज बुलंद करुया असे भावनिक आवाहन नीरजा यांनी याप्रसंगी केले.

जगाला प्रेम अर्पावे हे गाणं आपण म्हणतोय पण विद्वेषाचं वातावरण वाढतच चाललय अशी खंत जेष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली. आज फाळणीपेक्षाही जास्त तीव्र आणि हिंस्त्र विद्वेष पसरवला जात आहे असे सांगून आजचा विद्वेषाचा वाहक हा मोदित्ववादी सुशिक्षित मध्यमवर्ग आहे असे सडेतोड मत केतकर यांनी मांडले. संपूर्ण शासनव्यवस्था माध्यमांना हाताशी धरुन विद्वेष पसरवत आहे आणि या विद्वेषाच्या वातावरणात प्रेमाचा संदेश देणारे आपण आज अल्पसंख्य आहोत अशी वस्तुनिष्ठ मांडणी त्यांनी केली. साने गुरुजी १२५ निमित्ताने साने गुरुजींची आठवण महत्वाचीच आहे. त्यांचे उरलेले काम आपल्याला करायचे आहे याची जाणीवही त्यांनी उपस्थितांना करुन दिली.

प्रमुख पाहुणे प्रसिध्द सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी विद्वेषाचा काळ हा सतत असतोच पण त्या काळातही प्रेम फुलतच राहतं अशी सकारात्मक मांडणी करत उपस्थितांच्या मनात प्रेमाचा उद्गार उमटवला. ओलं मूळ हे दगडाला भेदून उगवून येतं, त्या ओल्या मुळाची ताकद ही प्रेमाच्या शक्तिशाली बीजात असते. हे प्रेमच जगाला तारेल असं सांगणारे साने गुरुजी हे खरे हिरो आहेत. हा संदेश देणारा जरी नाही राहिला तरी हा संदेश इतरांकडे पोहोचला

पाहिजे यासाठी त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या.

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष प्रमोद निगुडकर यांनी उद्‌घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप केला. विचारांना सोबत घेऊन ठामपणे उभं राहावं यासाठी स्मारकाची स्थापना पंचवीस वर्षांपूर्वी झाल्याची आठवण त्यांनी उपस्थितांना करुन दिली. विचारांशी जोडून घेण्याचा प्रयत्न समजून घेण्यासाठी हा दोन दिवसांचा साहित्य कला संवादाचा घाट घातला आहे असे सांगत निगुडकर यांनी या कार्यक्रमाचे प्रयोजन स्पष्ट केले आणि विचारांशी जोडून राहण्यासाठी साने गुरुजी स्मारकात येण्याचे आमंत्रणही दिले. भाषा हरवते की काय अशा जगात शब्द नसतील तर कसं सांगायचं? प्रेम करुणा व्यक्त कशी करायची हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. इतक्यात हरुन चालणार नाही, आपलं अल्पमत वाढवायचं आहे त्यासाठीच हा अट्टहास आहे. हा संवाद असाच चालू राहिल याची ग्वाहीही निगुडकर यांनी दिली.

आंतरभारती कलाभवनाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार युवराज मोहिते यांनी आभार मानताना उद्‌घाटन सत्रासाठी नागराज मंजुळे व कुमार केतकर यांचं आवर्जून उपस्थित राहणं हे आमच्या प्रतीच्या प्रेमाच्या ओलाव्यामुळेच आहे अशा शब्दांत उल्लेख केला. आम्ही प्रेमाचे वाहक आहोत, विचारांचे वाहक आहोत असे सांगत सेनानी साने गुरुजींना या निमित्ताने या सभागृहातील ८० टक्के तरुणाईपर्यंत पोहोचवण्याचं काम या संवादातून होत आहे याकडे उपस्थितांचं लक्ष वेधले. दोन दिवस मग पुढील सत्रांतून या तरुणाईला साहित्य आणि कलेच्या माध्यमातून प्रेमाची अनूभूति येतच राहिली.

विद्वेष नाकारणारे आवाज

'विद्वेषाच्या काळात प्रेमाचा उद्गार' या संकल्पनेवर बेतलेल्या या साहित्य कला संवादाच्या उद्‌घाटन सत्रानंतर पहिले सत्र होते, 'विद्वेष नाकारणारे आवाज' आणि या सत्राचे संवादक होते प्रसिध्द कवी, भाषांतरकार आणि 'मायमावशी' या नियतकालिकाचे संपादक गणेश विसपुते. द्वेषकाळात प्रेम आणि त्याची गरज याचे सुंदर विवेचन करत स्वत:च्या जन्मगावाच्या संदर्भात सूफी आणि भक्ती चळवळीची परस्परात घट्ट विणलेली वीण व त्यातलं सौंदर्य याविषयीचे प्रेरक संदर्भ देत विसपुतेंनी उपस्थितांना बोलते केले आणि "करेंगे पॉलिटिक्स, करेंगे प्यार, जुल्मी सरकार, खबरदार!" असे ठणकावूनही सांगितले.

बाबरी मशिद पाडल्यानंतर आलेल्या अस्वस्थतेतून देशभर फिरत सलोख्याचे प्रदेश धुंडाळणाऱ्या पत्रकार व लेखिका सबा नक्वी यांनी सद्यपरिस्थितीचा आढावा घेतला. आज सलोख्याचे प्रदेश नाकारले जात आहेत या वस्तुस्थितीबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. एकेकाळची एकतेची प्रतिकं आता विद्वेषाची प्रतिकं बनत चालली आहेत असं सांगतानाच सबा नक्वी यांनी समाजमन विद्वेषाने नाजूक झालं असलं तरी प्रेमाला अजून त्यात जागा आहे, उम्मीद की गुंजाईश है अस म्हणत उपस्थितांमध्ये आशा जागवली.

विद्वेष नाकारण्याच्या आवाजात संग्राम गायकवाड या सनदी अधिकाऱ्याने लिहिलेल्या दखनी भाषेतील 'मनसमझावन' या कादंबरीचा उल्लेख गणेश विसपुते यांनी केला. या कादंबरीबद्दल बोलताना गायकवाड यांनी शहा तुराब अली यांनी १८व्या शतकात मनाच्या श्लोकांचा समावेश केलेल्या 'मनसमझावन' या पद्यग्रंथाचा उल्लेख केला. या ग्रंथाने दखनी भाषेत सुफी आणि मुस्लिमेतर वारकरी संतांच्या संवादाची प्रक्रिया पुढे नेली. फिक्शनचा वापर करून मनात आहे ते व्यक्त करता येते असे सांगताना त्यांनी आपल्या कादंबरीतून हिंदू–मुस्लिम सहजीवनाची कल्पना मूळच्या सोशिक, उदार, सहिष्णु अशा पारंपरिक लोकधर्माला अनुसरल्याने प्रत्यक्षात येईल हे दाखवता आले याची आठवण करुन दिली. संमिश्र संस्कृतीला त्याज्य मानणारे इतिहासाची विपरित मांडणी करताना दिसत आहेत असे स्पष्ट मत मांडताना गायकवाड यांनी सुफी आणि वारकरी परंपरेतून दखनी संस्कृती उदयाला आल्याचे प्रतिपादन केले.

प्रसिध्द पटकथाकार व लेखिका मनिषा कोरडे यांनी आजच्या चित्रपटांत वा सेन्सॉरची भीती नसलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर आज 'अमर अकबर अँथनी' का नाही हा प्रश्न उपस्थित केला. या माध्यमात काम करताना अभिव्यक्तीवर प्रचंड मर्यादा येतात हे त्यांनी कबूल केले. विद्वेषाच्या काळात जग दुभंगलेले आहे त्यामुळे समाजमनातील निरागसता लोप पावली आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. गंगाजमनी तहजीब हा दोन संस्कृतीचा मेळ असल्याचे सांगून तिंबलेल्या कणकेसारखी असलेली गंगाजमनी तहजीब आपण वेगळी करु शकत नाही असे स्पष्ट मत कोरडे यांनी व्यक्त केले. या साहित्य कला संवादात येऊन प्रेमाचे आणि शांतीचे होत असलेले आदान प्रदान पाहून उमेद वाटली अशी सकारात्मक भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सानेगुरुजींच्या प्रेमाच्या संदेशाचे औचित्य काय या प्रश्नाला प्रेम हे आताच्या विद्वेषाच्या काळातले उत्तर आहे आणि म्हणूनच विद्वेष नाकारणारे आवाज बुलंद झाले पाहिजेत, ते आवाज ऐकले गेले पाहिजेत. बोलणे आणि विचार करणे आम्ही बंद करणार नाही असा स्पष्ट इशारा या सत्रातून देत गणेश विसपुते यांनी हिंदीतील प्रसिध्द कवी उदय प्रकाश यांची पुढील कविता वाचून या सत्राची सांगता केली:

आदमी
मरने के बाद
कुछ नहीं सोचता.
आदमी
मरने के बाद
कुछ नहीं बोलता.
कुछ नहीं सोचने
और कुछ नहीं बोलने पर
आदमी
मर जाता है.

ढाई आखर प्रेम के

साहित्य कला संवादातलं पुढचं सत्र होतं, ढाई आखर प्रेम के! आंतरधर्मिय, आंतरजातिय विवाहांना पाठबळ देणारे केंद्र उभारणारे शंकर कणसे यांना या निमित्ताने बोलतं केलं ते जेष्ठ लेखक डॉ.प्रदिप आवटे यांनी! लव्ह जिहाद आणि जातपंचायतीने प्रेम करणाऱ्यांच्या धर्माच्या आणि जातीच्या नावावर मुस्क्या आवळल्यात. अशा परिस्थितीत शंकर कणसेंसारखी माणसे प्रेम करणाऱ्यांसोबत ठामपणे उभे राहतात हे खूप आश्वासक आहे. साहित्य कला संवादात संवादाची ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि सोबतीची ग्वाही देण्यासाठी या सत्राचे आयोजन केले होते.

आंतरधर्मीय आंतरजातीय विवाह करु इच्छिणाऱ्यांना सुरक्षा निवारा केंद्राच्या माध्यमातून पाठबळ देणारे शंकर कणसे यांनी अशा प्रकारचं सेफ होम करायला लागणं हे समाजासाठी लांच्छनास्पद आहे अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्यकर्ता असलेले शंकर कणसे यांनी जात ही अंधश्रध्दा आहे असे मानत काम करायला सुरुवात केली आणि विवेकवादी समाजनिर्मितीचं स्वप्न बघताना जोडीदाराच्या विवेकी निवडीचे स्वातंत्र्य मिळायला हवे यासाठी काम करण्याचे ठरवले.

प्रेम करण्याकरता caste certificate ची गरज नसते पण समाजाच्या भीतीने मग घरातल्यांचं वागणंच कसं बदलतं याबद्दल आरती भोसले या तरुणीने आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. केतन राऊत या तरुणानेही आंतरधर्मीय लग्न करताना व्यक्ती म्हणून नाही पण धर्म म्हणूनच अडचण आली हे स्पष्ट केले. कुटुंबियांचा विरोध हा समाजाच्या दबावाचाच परिणाम होता असेही त्याने सांगितले. या कठीण काळात कणसे सरांनी दिलेला पाठिंबा आणि समुपदेशनाचा केतनने आवर्जून उल्लेख केला. साहित्य कला संवादसारख्या विचारमंचावर प्रेमाबद्दल बोलताना नवीन उमेद निर्माण झाली आहे असेही तो म्हणाला.

भारतीय संविधानाने दिलेला प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार हा सर्वांसाठी सारखाच आहे. प्रेम करणे हा मूलभूत अधिकार आहे आणि तो बजावता येण्यासाठी समाजात निकोप वातावरण तयार करणं ही आपली सर्वांची जबाबदारी आहे अशी संविधानाच्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव जेष्ठ लेखक डॉ. प्रदिप आवटे यांनी करुन दिली. आंतरजातीय, आंतरधर्मीय लग्नांमुळे जातीअंताच्या चळवळीला बळ तर मिळतेच त्याचबरोबर स्वयंनिर्णयाचा अधिकार वापरण्याची हिंमतही मिळते असे म्हणत अंधश्रध्दा निर्मूलन समितिच्या जेष्ठ कार्यकर्त्या मुक्ता दाभोळकर यांनी तरुणाईला स्वयंनिर्णयाचा अधिकार वापरण्याचे आवाहनही केले.

सभागृहातील मोठ्या संख्येने उपस्थित तरुणाईचा शिट्ट्या, टाळ्यांनी या सत्राला दिलेला प्रतिसाद मंचावरील सर्वांचा तसेच आयोजकांचा व उपस्थित कार्यकर्त्यांचा हुरुप वाढविणारा व तरुणाई आपल्या सोबत आहे हा विश्वास सार्थ करणारा!

या साहित्य कला संवादात वरील तीन सत्रांबरोबरच पर्यायी माध्यमातील शिलेदार हा निर्भिड माध्यम पत्रकारांचा परिसंवाद, रंगचित्रयात्रेतला अमोल ऐवज हा प्रसिध्द दिग्दर्शक अभिनेते अमोल पालेकर यांच्याशी अभिनेते किशोर कदम यांनी साधलेला संवाद, ईदगाह या मुंशी प्रेमचंद यांच्या कथेवरील सादरीकरण, उत्तरा चौसाळकर यांचे बाऊलगान आणि मुकुंद कुळे यांनी त्यांच्याशी साधलेला संवाद, आजचा काळ आणि कलेचं जतन यावरील चर्चेत

(पान ३४ वर)

रेल्वेतील कंत्राटी कामगारांच्या लढ्याला यश!

जगदीश खैरालिया

रेल्वेतील कंत्राटी कामगारांना किमान वेतनाचा फरक मिळणार! श्रमिक जनता संघ युनियनच्या प्रयत्नांना यश!

मध्य रेल्वेच्या मेल एक्स्प्रेस गाड्यां मधील पॉवरकार मध्ये टेक्निशियन पदांवर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना श्रमिक जनता संघ युनियनच्या वतीने दाखल केलेल्या वसुली दावा क्र. MCA- 11/ 2022 मध्ये निर्गमित आदेशाने किमान वेतनाच्या फरकाची थकीत रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मध्य रेल्वेने 2018 पासून लांब पल्ल्याच्या मेल व एक्स्प्रेस गाड्यांमधील पॉवरकार मध्ये कार्यरत कायम स्वरुपी टेक्निशियन / इलेक्ट्रीशियन कर्मचाऱ्यांचे जागी कंत्राटी पद्धतीने सुमारे 300 टेक्निशियन / इलेक्ट्रीशियन पदांवर ठेकेदार मार्फत नेमले आहेत. कंत्राटदार कामगारांना कायदेशीर वेतन, भत्ते आणि कायद्यानुसार सोयी सुविधा देत नसल्याने सदर कर्मचारी श्रमिक जनता संघ युनियनचे सभासद झाले व किमान वेतन कायद्याचा आधार घेत युनियन तर्फे हा वसुली दावा दाखल करण्यात आला होता.

रेल्वे प्रशासनाने टेंडर प्रक्रिया करून ग्रीव्हज कॉटन लिमिटेड या कंपनीला कंत्राट दिला होता. परंतु स्वत: ही कामे न करता परस्पर त्यांनी M/s. धारा रेल प्रोजेक्ट प्रा. लिमिटेड या कंपनीला उप ठेकेदार म्हणून नेमणूक केली होती.

मेल -एक्सप्रेस ह्या गाड्या लांब पल्ल्याच्या असल्याने गाडी गंतव्य स्थानकावर जाऊन परत मुंबईतील मूळ स्थानकावर परत येईस्तोवर कर्मचाऱ्यांना सतत ड्यूटीवर हजर रहावे लागते. अशा परिस्थितीतही दिवसाला फक्त आठ तास ड्युटी धरून ठेकेदार फक्त रू.16,500/- इतकेच वेतन अदा करत होते. वेतनाशिवाय कोणती सुविधा दिली जात नव्हती. या आदेशानुसार आता कामगारांना अतिकालिक भत्ता व कंत्राटी कामगारांना लागू अन्य कायदेशीर सुविधा ही मिळण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे.

किमान वेतन अधिनियम नुसार वेतन तसेच सतत ड्यूटी असल्याने प्रत्येक दिवसाला चार तास ओव्हर टाईम बाबतीत निर्देश निर्गमित झाल्याने कामगार कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या केसमध्ये सामिल ३१ कंत्राटी कर्मचाऱ्यांना सात महिन्यांच्या किमान वेतनाच्या थकीत फरकाची रक्कम रू. 43,76,953 मिळण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्य कामगार उप आयुक्त (केंद्रीय) ,सायन, मुंबई येथील किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत प्राधिकृत अर्थॉरिटी रिजनल लेबर कमिशनर श्री सुनील माळी यांनी श्रमिक जनता संघ युनियनच्या वतीने दाखल वसुली दावा क्र. MCA- 11/ 2022 मध्ये आदेश निर्गमित केले आहे.

सात महिन्यांच्या वेतन फरकाची रक्कम फक्त ३१ कर्मचाऱ्यांची 43 लाख 76 हजार 953 म्हणजे सुमारे सरासरी दीड लाख रुपये प्रत्येकी मिळणे अपेक्षित आहे. तीन वर्षांत 300 कर्मचाऱ्यांचे सुमारे २१ कोटी 78 लाख रूपयांची हेराफेरी कंत्राटदार कंपन्यांनी केल्याचा अंदाज आहे. रोजगाराची असुरक्षितता भासवून श्रमिकांच्या कष्टाच्या व हक्काच्या वेतनावर डल्ला मारला जातो आहे.

रेल्वे मध्ये विविध प्रकारच्या कामांसाठी मोठ्या संख्येने कंत्राटदारांमार्फत कर्मचारी नेमण्यात आले आहेत. धावत्या ट्रेनमध्ये साफसफाई पासून इतर विविध सेवा पुरवणारे कामगार, रेल्वे ट्रॅक्सवर, वर्कशॉपमध्ये आणि अन्य पदांवरील कायम स्वरुपी कामगारांच्या जागी कंत्राटी पद्धतीने कामगार काम करतात. मात्र कंत्राटदारांमार्फत कार्यरत कर्मचाऱ्यांचे शोषण सर्वत्र सुरू आहे. कंत्राटीकरण 'श्रमिकांची लूट ठेकेदारांना सूट' या तत्त्वावर सुरू आहे. कायम स्वरुपी, बारमाही आणि सतत चालणाऱ्या सेवेत कंत्राटी कामगार नेमण्यासाठी खुद्द कंत्राटी कामगार कायद्याने प्रतिबंध आहे आणि काही अपरिहार्य परिस्थितीत कामगार नेमावे लागले तर त्यांना त्या आस्थापनां मधील कायमस्वरूपी कामगारांच्या सारखे वेतन, भत्ते आणि सोयी सुविधा पुरविण्यासाठी तरतूद केली आहे. परंतु शासकीय आणि निमशासकीय क्षेत्रात सर्रासपणे

(पान ३४ वर)

आघाडीवर

राज्यभर पुरेशी सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करा

किसान सभा

राज्यातील खरिपाचे महत्त्वाचे पीक असलेल्या सोयाबीनला सरकारच्या धोरणामुळे आधार भावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची मते मिळावीत यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार सोयाबीनला ६००० रुपये भाव देईल अशी घोषणा केली होती. सोयाबीन खरेदीसाठीचा आर्द्रता निकष सुद्धा १५ टक्क्यापर्यंत वाढवण्याची घोषणा करण्यात आली होती. तत्पूर्वी मोदी की गॅरंटी म्हणून जाहीर करण्यात आलेल्या हमीभावाप्रमाणे सोयाबीनला ४८९२ रुपये प्रति क्विंटल भाव देण्याचे जाहीर करण्यात आले होते.

प्रत्यक्षात मात्र या कोणत्याही आश्वासनाची पूर्तता करण्यात न आल्यामुळे शेतकयांमध्ये मोठा असंतोष खदखदत आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने याबाबत हस्तक्षेप करून दिलेला शब्द पाळावा व किमान ६००० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे १५ % आर्द्रता असलेले सोयाबीन खरेदी करणारी केंद्रे प्रत्येक बाजार समितीत सुरू करावीत. राज्यात काही ठिकाणी हमीभावाप्रमाणे सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरू करण्यात आली असली तरी सर्व बाजार समित्यांवर ही केंद्रे नसल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन वाहून नेण्यासाठी मोठा खर्च होत आहे. वाहतुकीचा खर्च न परवडल्यामुळे शेतकरी आपले सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांना ४००० रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे विकत आहेत. राज्य व केंद्र सरकारने या पार्श्वभूमीवर तातडीने हस्तक्षेप करून राज्यभरातील सर्व बाजार समित्यांमध्ये सरकारी हमीभाव खरेदी केंद्रे सुरू करून शेतकऱ्यांना ताबडतोब दिलासा द्यावा.

९८६९४०१५६५

आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहित जोडप्यांसाठी 'सेफ हाऊस' निर्णयाचे स्वागत

राईट टू लव्ह

महाराष्ट्र शासनाने समाजातील समता, सहिष्णुता, आणि प्रेमाला प्रोत्साहन देण्यासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गृह विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील गेस्ट हाऊसना ''सेफ होम (Safe Home)'' म्हणून घोषित करण्यात आले आहे. हा निर्णय आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी सुरक्षित निवास उपलब्ध करून देण्यासाठी क्रांतिकारी ठरणार आहे. या निर्णयाचे उद्दिष्ट: समाजात समता व सहिष्णुतेचा प्रसार: या निर्णयामुळे सामाजिक एकतेला चालना मिळेल. प्रेमविवाह करणाऱ्या जोडप्यांना संरक्षण: अशा जोडप्यांना त्यांच्या सुरक्षेबाबतची भीती दूर करून सुरक्षित जीवन जगता येईल. शांततामय निवास: जोडप्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनाची सुरुवात विश्वासाने आणि आनंदाने करता येईल.

यातील महत्त्वाचे मुद्दे: राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील गेस्ट हाऊस "सेफ होम" म्हणून घोषित करण्यात आले आहे. विशेष कक्ष (Special Cell) स्थापन करून या जोडप्यांना मदत व मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेष कक्षामार्फत या सेफ होमच्या सुविधेबाबत सविस्तर माहिती दिली जाईल.

महाराष्ट्र शासनाच्या या स्वागतार्ह निर्णयाचे मन:पूर्वक अभिनंदन. "हा निर्णय समाजातील समता व सहिष्णुतेचा पाया अधिक मजबूत करेल. अनेक जोडप्यांना त्यांच्या प्रेमाचा अधिकार निर्भयपणे बजावता येईल. शासनाच्या या पुढाकारामुळे प्रगत समाजाची उभारणी शक्य होईल.''

सर्व जोडप्यांना आवाहन: जर तुम्ही आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केला आहे आणि तुम्हाला सुरक्षित निवासाची गरज आहे, तर या सेफ होम सुविधेचा लाभ घ्या. अधिक माहितीसाठी आपल्या जिल्ह्यातील विशेष कक्ष (Special Cell) किंवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधा.

("राईट टू लव्ह'' हा उपक्रम अनहद सोशल फाउंडेशन चा आहे.)

८३२९१७४६१४

(विशेषः पान ९ वरुन)

होऊन गेली. यावर्षी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधानाच्या मंजुरीची पंच्याहत्तरी पूर्ण होईल. तरीही या पाऊण शतकात महिलांच्या राज्य किंवा केंद्राच्या कायदेमंडळात महिलांची संख्या निम्मी सोडा, पावही झालेली नाही. १९५१ सालच्या पहिल्या लोकसभेत ५ टक्के महिला होत्या. सतराव्या लोकसभेपर्यंत ही संख्या साडे १४ टक्क्यांवर गेली. त्यावेळी ७८ महिला खासदार लोकसभेत होत्या. चालू १८ व्या लोकसभेत त्यांची संख्या ४ ने कमी होऊन ७४ झाली आहे. साहजिकच टक्केवारीही १४ टक्क्यांच्या खाली आली. राज्यांच्या विधानसभेतही महिलांचं सरासरी प्रतिनिधीत्व ९ टक्के इतकं नगण्य आहे. इतर देशांशी तुलना करता ही स्थिती अधिक बोचरी होते. द. आफ्रिकेत ४६ टक्के, इंग्लंडमध्ये ३५ टक्के तर अमेरिकेत २९ टक्के महिला मध्यवर्ती सभागृहात आहेत. म्हणूनच राजकीय पक्षांच्या वा जनतेच्या विवेकबुद्धीवर सोडून भागत नाही. यासाठीच १९९६ साली लोकसभा व विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षणाचं विधेयक आणलं गेलं. नगण्य अपवाद वगळता राजकारणातील पुरुषी विरोधानं ते गेली २६ वर्षं बाजूला पडलं होतं. मागच्या लोकसभेच्या अखेरीस केंद्र सरकारच्या पुढाकारानं ते मंजूर झालं. मात्र त्याची अंमलबजावणी लगेच होणार नाही. नवी जनगणना आणि मतदारसंघांची फेररचना झाल्यावर हा निर्णय अमलात येईल. यास बराच अवकाश लागू शकतो. अर्थात, दोन तपांहून अधिक काळ अंधारकोठडीत पडलेल्या या मुद्द्याला काही काळानं का होईना प्रकाशाची तिरीप दिसेल हा दिलासा तरी मिळाला.

आज जे वर्तमान आपण पाहतो आहे, ते आपल्या पूर्वसुरींच्या खांद्यावर बसून. त्यांच्या खटपटींमुळेच हे वर्तमान उजाडलं आहे. ते निष्कंटक नाही. त्यात अनेक आव्हानं आहेत. ती पेलण्यासाठी आपल्या आधीच्या पिढ्यांनी काढलेले मार्ग, योजलेले उपाय आपल्याला आज मार्गदर्शक ठरु शकतात. म्हणूनच संविधानसभेतल्या या आपल्या आया, आज्या, मावश्यांच्या आठवणी जागवणं, त्यांचे अनुभव समजून घेणं मोलाचं ठरेल.

या अनुभवांतून मिळालेल्या बोधाचा प्रचार–प्रसार करणं आणि त्या विचारप्रकाशात आपण प्रस्थान ठेवणं ही त्यांना खरीखुरी आदरांजलीही असेल.

टीपः एक नोंद देणं गरजेचं आहे. या तसेच पुढील सर्व भागांतील माहिती विविध स्रोतांतून घेतली आहे. तथापि, ज्यांचा सर्वाधिक उपयोग झाला अशा दोन पुस्तकांचा साभार उल्लेख करत आहे – १) द फिफ्टीन – लेखक : अँजेलिका अरिबाम आणि आकाश सत्यवली, हॅचेट इंडिया प्रकाशन. २) फाऊंडिंग मदर्स ऑफ द इंडियन रिपब्लिक – लेखक : अच्युत चेतन, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस प्रकाशन

(मुंबई आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरुन दर मंगळवारी स. ९ वा. प्रसारित होणाऱ्या 'संविधान सभेतल्या शलाका' या १६ भागांच्या मालिकेचा पहिला भाग संविधान दिनी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रसारित झाला. त्याचे हे मूळ टिपण.)

sawant.suresh@gmail.com

(वृत्तांतः पान ३१ वरुन)

या विषयावरील दिग्गजांचा समावेश, समारोप सत्रात सुप्रिया सुळे यांचा सहभाग अशी भरगच्च मेजवानी होती. समारोप सत्रानंतर सादर झालेला 'बात पश्मिने की..'' हा गुलजार यांच्या कारकिर्दीवर आधारलेला कार्यक्रम म्हणजे दोन दिवसांच्या कला साहित्य संवादाचा कळसोध्याय! अत्यंत तरल अशा शब्द आणि संगीताच्या प्रेममय वळणावर सांगता झालेला हा साहित्य कला संवाद येणारे कित्येक दिवस मनात रुंजी घालणारा, आव्हानांना भिडायला सज्ज करणारा! प्रेमाच्या पखरणीने विद्वेषाच्या काळाची दाहकता कमी करणारा!

सिरत सातपुते

satputesirat@gmail.com

(श्रमिक जगतः पान ३२ वरुन)

कामगार कायद्यांचे हनन केले जात आहे.

आता तर कामगार कायद्यांचे निरसन करून लेबर कोडच्या माध्यमातून मालक वर्गाला शोषण करण्याची परवानगीच केंद्र सरकारने दिली आहे. स्वातंत्र्याचे अमृतकाल हे कष्टकरी जनतेसाठी नव्हे तर दलाली करणाऱ्यांच्या हिताचे ठरत असल्याने श्रमिकांना भक्कम एकजुटी शिवाय पर्याय उरलेला नाही.

9769287233

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे

– साने गुरुजी

MS-CIT मध्ये अनुभवा
AI - ML च्या रंजक दुनियेची सफर !
Artificial Intelligence and Machine Learning
Machine Learning (ML)
Virtual Reality (VR)
Internet of Things (IoT)
Robotics
3D Printing
Mobile App Development
Unlock your
Digital
Curiosity
ChatGPT
Generative AI
Artificial Intelligence
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by AI-ML
mscit.mkcl.org

प्रतिसाद

अतिशय उत्तम आणि संग्राह्य अंक

जानेवारी चा अंक अतिशय उत्तम आणि संग्राह्य आहे. त्याबद्दल तुझं अभिनंदन.साने गुरुजी १ २ ५ या कार्यक्रमाला हजेरी लावण्याची खूप इच्छा होती. परंतु शक्य झालं नाही. मात्र ती उणीव सीरत सातपुतेच्या वृत्तांकनातून भरून निघाली. मेधा पाटकर यांचा लेख अरुंधती रॉय यांच्या लिखाणाची आठवण करून देणारा आहे. किरोते यांचा लेखही छान आहे.

समाजवाद म्हणजे काय असा प्रश्न मी अच्युत पटवर्धन यांना विचारला होता. ते उत्तरले–– सोसायटी ऑफ फ्री अँण्ड इक्वल मेन अँण्ड वीमेन. मी त्यामध्ये दुरुस्ती सुचवली–– सोसायटी ऑफ फ्री अँण्ड इक्वल इंडिव्हिज्युअल्स. त्यांनी कारण विचारलं. मी उत्तरलो–– यामध्ये ट्रान्सजेन्डर्सनाही सहभागी करायला हवं. त्यांना ते पटलं (अंकातील संपादकीयावरचं माझं भाष्य).

केरळमधील दौऱ्याचा वृत्तांतही आवडला. कोझीकोडे म्हणजे कोळ्हीकोडे. इंग्रजी स्पेलिंगचा उच्चार आपण टाळायला हवा. तरच आपण येथील विविधता सामावून घेऊ. उदाहरणार्थ जालियनवाला बाग याचा पंजाबी उच्चार जालियाँवाला बाग असा आहे. मेरठ ऐवजी मीरत वापरणं चुकीचं आहे. चंडीगढ चा उच्चार मराठीमध्ये चंदिगड असा केला जातो, गुवाहाटीला गोहत्ती असं म्हटलं जातं. या बारक्या बाबी आहेत. परंतु साने गुरुजींच्या लेखी त्या महत्वाच्या ठरल्या असत्या. असो.

सुनील तांबे, स्वतंत्र पत्रकार
suniltambe07@gmail.com

वैश्विक आर्थिक सत्ताधीशांवर पुस्तिका प्रसिद्ध होणे गरजेचे

यंदाचाही अंक नेहमीप्रमाणेच खूप छान आणि माहितीने भरपूर असा आहे. विशेषत: मेधा ताईंनी लिहिलेला जागतिक बँकेविषयी चा लेख खूपच प्रासंगिक आणि वैश्विक दिशा देणारा आहे. जागतिक बँकेच्या स्थापनेला पन्नास वर्षे होताना दिल्ली येथील कार्यकर्त्यांनी वर्ल्ड बँकेवर लिहिलेली अतिशय चांगली पुस्तिका माझ्या संग्रहात आहे. या निमित्ताने असे सुचवावेसे वाटते की जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, एशियन डेव्हलपमेंट बँक अशा विविध वैश्विक आर्थिक सत्ताधीशांवर सर्वसामान्यांना माहिती होईल अशा भाषेत पुस्तिका प्रसिद्ध होणे गरजेचे आहे. सिरत सातपुते यांनी लिहिलेले दोन्हीही रिपोर्ट मनापासून आवडले. मी या मोहिमेत सहभागी झालो नाही असे दु:ख वाटते.

सध्याच्या धर्मकेंद्रित राजकारणामध्ये लोकशाही समाजवादी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी एन ए पी एम ची धडपड खूप गरजेची आहे हे लक्षात येते. भारत जोडो अभियाना विषयी देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात केलेल्या वक्तव्याचे खंडन करणारे निवेदन प्रसिद्ध झाले आहे. परंतु या निमित्ताने भारत जोडो अभियानाची इत्यंभूत माहिती देणारे लेख प्रसिद्ध झाले तर खूपसे गैरसमज कमी होऊ शकतील आणि कार्यकर्त्यांचे मनोबल देखील उंचावेल यात शंका नाही. आपणास पुन्हा एकदा धन्यवाद, आपले परिश्रम सार्थकी लागो हीच कामना.

दीपक श्रीवास्तव, निफाड, नाशिक
९८९०९५५७६३

साने गुरुजींची सगळी पुस्तके वाचायला हवीत

आंदोलनाचा जानेवारीचा अंक आवडला. सिरत सातपुते यांचा लेख वाचून साने गुरुजींची सगळी पुस्तके वाचायला हवीत असे वाटले. अंकातील सगळेच लेख चांगले आहेत.

डॉ. वासंती मसुरेकर, माहीम, मुंबई
santisarvin1@gmail.com

To

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.